# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनांक ११-११-२०१४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

मंगळवार दिनांक ११ नोव्हेंबर २०१४ रोजी (का.प.क्र .३३) मा.महापौर सौ.कला रविनंदन ओझा यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२-३० वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.प्रकाश महाजन, आयएएस, नगरसचिव श्री.प्रमोद का.खोब्रागडे तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स.श्री.जोशी संजय रामदास
२. स.स. श्री. किशोर बाबुराव नागरे
३. स.स.श्री. रावसाहेब धोंडीराम गायकवाड
४. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
५. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
६. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
७. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
८. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
९. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
१०. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
११. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे
१२. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१३. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१४. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१५. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१६. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१७. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१८. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१९. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२०. स.स.श्री.बोराडे रामदास काशीनाथ
२१. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२२. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ

२३. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२४. स.स.श्री.खान जहांगिर अब्बास
२५. स.स.श्रीमती जरीना म.जावेद
२६. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
२७. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
२८. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
२९. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३०. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३१. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३२. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
३३. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
३४. स.स.श्रीमती परवीन खैसर खान
३५. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
३६. स.स.श्री.मुजीबखान मीर आलमखान
३७. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
३८. स.स.श्री.मोहम्मद मुजीबउद्दीन कदिरोद्दीन
३९. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
४०. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४१. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
४२. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४३. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४४. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
४५. स.स.श्री.खान आगा मिया खान
४६. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
४७. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
४८. स.स.श्री. बबन पंडीतराव नरवडे
४९. स.स.श्री. वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंते
५०. स.स.श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
५१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
५२. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव

५३. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
५४. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
५५. स.स.श्रीमती शिंदे सत्यभामा दामोधर
५६. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
५७. स.स.श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
५८. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
५९. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
६०. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
६१. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
६२. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
६३. स.स.श्री. सुशिल तुकाराम खेडकर
६४. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव
६५. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
६६. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
६७. स.स.श्री.अब्दुल सिकंदर अब्दुल साजेद
६८. स.स.श्री.खान अक्रम करीम खान
६९. स.स.श्रीमती घोडेले अनिता नंदकुमार
७०. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
७१. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
७२. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन
७३. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नांवे</u>**

१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव
२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद
३. श्रीमती पाटील रेखा दिनकरराव
४. श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया

श्री.गजानन बारवाल :हिंदी चित्रपटाचे जेष्ठ अभिनेता श्री.सदाशिव अमरापूरकर तसेच स.सदस्या श्रीमती सविता घडमोडे यांचे चुलत सासरे श्री.विश्वबंर घडमोडे प्रसिध्द उद्योजक श्री. चंपालाल देसरडा यांचे दु:खद निधन झाले या सर्वांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.किशोर नागरे :जवखेडे येथील दलीत हत्याकांड मध्ये ज्यांचा मृत्यू झाला त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.संजय केनेकर :यास माझे अनुमोदन आहे.

श्री.मीर हिदायत अली :११२४ कर्मचारी भरतीतील ०२ कामगांराचा मृत्यू झाला त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.रावसाहेब गायकवाड:आताच स.स.नी ज्यांची नावे सुचविली त्यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

यावेळी स्व.सदाशिव अमरापूरकर, स्व.चंपालाल देसरडा,स्व.विश्वभंर घडमोडे,व जवखेडे येथील हत्याकांड मध्ये मृत्यु झालेल्यांना तसेच ११२४ कर्मचारी भरतीतील मृत्यू झालेल्या ०२ कामगारांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.किशोर नागरे :महिन्यापुर्वी या राज्याची विधानसभेची निवडणूक झाली त्यात जे आमदार निवडूण आले त्यांचे व मुख्यमंत्री पदी मा.श्री.देवेद्र फडवणीस यांची निवड झाली व शिवसेनेचे गटनेते पदी श्री.एकनाथ शिंदे ,या सभागृहाचे स.सदस्य श्री.नारायण कुचे हे आमदार म्हणून निवडून आले तसेच भाजपा गटनेते श्री.संजय केनेकर हे मॉरीसेस या देशामध्ये जाऊन आले. त्याबद्दल या सर्वांचे सभागृहात अभिनंदन करावे.

श्री.मीर हिदायत अली :माजी पालकमंत्री व स.आमदार श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांची कॉग्रेस आय पक्षाचे गटनेतेपदी निवड झाली त्याचे अभिनंदन करावे.

श्री.गजानन बारवाल :स.सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे यास माझे अनुमोदन आहे.तसेच या शहरातील सर्व नवनिर्वाचित मा.आमदार यांचे अभिनंदन करावे.

श्री.संजय केनेकर :२०१४ च्या विधान सभेत भारतीय जनता पार्टीला जनतेकडून कौल मिळाला सरकार स्थापन होवून मुख्यमंत्री पदी मा.श्री.देवेद्र फडवणीस यांची निवड झाली तसेच सभागृहातील जे स.सदस्य श्री.नारायण कुचे व श्री.संजयजी सिरसाट हे आमदार झाले त्यांचे तसेच श्री.अतुलजी सावे व शिवसेनेचे गटनेते मा.एकनाथजी शिंदे या सर्वांचे अभिनंदन करण्याचा ठराव ठेवला त्यास माझे अनुमोदन आहे.

मा.उपमहापौर :स.सदस्य श्री. प्रमोद राठोड यांनी अद्यावत यंत्रणा त्यांचे वार्डात राबविली ही अभिनंदनास्पद बाब आहे.तसेच मनपातील श्री.डी. पी कुलकर्णी यांनी जमिनीतील पाण्याची शुध्दता ही अभियांत्रिकीमधून पीएचडी पदवी प्राप्त केली त्यांनी आता महापालिकेसाठी चांगले कामे करावे.त्यांचे ही अभिनंदन करावे.

श्री.गिरजाराम हळनोर :महाराष्ट्रात सरकार विराजमान झाले. मुख्यमंत्री पदी मा.श्री.देवेंद्र फडवणीस यांची निवड झाली या सरकारकडून जनतेच्या मोठया अपेक्षा वाढल्या आहे. महापालिकेच्या विकासासाठी व नवीन योजना राबविण्यासाठी जे अनुदान शासनाकडून घेणे आहे घेण्याची गरज आहे असे सर्व अनुदान आणण्यासाठी महापालिकेचे सर्व स.पदाधिकारी मा.आयुक्त व येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे माध्यमातून शासनाकडे प्रत्यक्ष भेटून मागण्या मान्य करून घ्याव्यात आणि मनपाच्या विकासात्मक कार्यवाही करावी आणि आता जो अभिनंदनाचा ठराव मांडला त्यास अनुमोदन आहे.

श्री.मुजीब खान :औरंगाबाद विधानसभा मध्यमधून एमआयएम पक्षाचे आमदार निवडून आले त्यांचे अभिनंदन करावे.

श्री.काशिनाथ कोकाटे :या सभागृहाचे स.सदस्य श्री.नारायण कुचे आमदार झालेले आहे, १९९० पासून या सभागृहात असलेले स.सदस्य आमदार झालेले आहे.जे निवडुन आलेले त्यांचे अभिनंदन करावे तसेच श्री.नारायण कुचे हे या सभागृहाचे स.सदस्य होते त्यांचा या ठिकाणी सत्कार समारंभ आयोजित करावा.

मा.महापौर :मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडवनीस तसेच शिवसेना गटनेते पदी श्री.एकनाथ शिंदे यांची निवड झाली. स.सदस्य श्री.नारायण कुचे व राज्यातील सर्व निवडून आलेले मा.आमदार तसेच कामगाराचे प्रश्न सोंडविण्यासाठी श्री.सजंय केनेकर यांनी मोरीसेस या देशात दौरा केला. त्यांचे व औरंगाबाद मध्य विधानसभेतून एमआयएमचे मा.आमदार इम्तियाज जलील तसेच स.सदस्य श्री. प्रमोद राठोड यांनी जी वार्डात अद्यावत यंत्रणा राबविली व तसेच मनपाचे श्री. डी पी कुलकर्णी, सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी अभियांत्रिकी मधून पीएचडी ही पदवी प्राप्त केल्याबद्दल या सर्वांचे सभागृहाच्या वतीने आभिनंदन करण्यात येते.

यावेळी सभागृहात मा.महापौर यांनी स श्री.प्रमोद राठोड तसेच श्री. डी पी कुलकर्णी यांचे पुष्पगुच्छ देवून अभिनंदन केले.

श्रीमती नुझत तरन्नुम खान:११ नोंव्हेबर या दिवशी मौलाना अबुल कलाम आझाद याची जयंती आहे. महानगरपालिकेतर्फे कोणताही कार्यक्रम ठेवलेला नाही.

श्री.मीर हिदायत अली :आज ११ नोव्हेंबर आहे. या दिवशी मौलाना अबुल कलाम आझाद यांची जयंती असते. भाजपा सरकारने त्यांचे जयती निमित्तांने पेपरमध्ये त्यांचे कार्याचा गौरव केल्या बाबतची बातमी आहे. परंतु महापालिकेचे त्यांचे नावाने संशोधन केंद्र आहे, परंतु कोणतेही कार्यक्रम या निमित्ताने ठेवलेले नाही.हे वाईट वाटते. या बाबत प्रशासनाने खुलासा घ्यावा.

श्रीमती फिरदोस फातेमा खान :मौलाना अबुल कलाम आझाद यांची आज जयंती आहे आणि त्यांचे नावे मनपाचे संशोधन केंद्र आहे.त्यांचे जयंती निमित्त कार्यक्रम का ठेवले नाही? इतर महापुरूषांची जयंती साजरी होते परंतु त्यांची जयंती केंद्रातर्फे का केली नाही?

श्री.कृष्णा बनकर :महापालिकेमध्ये त्यांचे नावाचे संशोधन केंद्र आहेत सभागृहात मौलाना आझाद यांचा फोटो आहे. त्यांची जयंती साजरी करण्यास महापालिकेला विसर पडतो याचा मी ‘निषेध’ करतो. सभागृहातील त्यांचे फोटोला पुष्पहार अर्पण करून जयंतीचा कार्यक्रम घ्यावा.

मा.उपमहापौर :माझ्या मते ती प्रथा आपल्याकडे नव्हती आता सुरू करावी.

मा.महापौर :स.सदस्यांच्या भावना लक्षात घेवून प्रशासनाने या बाबत कार्यवाही करावी.

श्री.त्रिबक तुपे :लाईट, एलबीटी,पाणी, ड्रेनेज, साफसफाईच्या संदर्भात प्रश्न आहे.एक एक विषय चर्चेला घेवून, त्यांवर निर्णय घ्यावे.रस्ता रूंदीकरणाचे काम हाती घेतले, रस्त्यासाठी लागणा-या जागा ताब्यात घेतल्या त्या जागा मालकास मोबदला दिला नाही, रस्त्याची कामे अर्धवट ठेवली तेथे अतिक्रमण झाले. मग तो गुंलमंडी, जवाहर कॉलनी, शहागंज, गजानन महाराज मंदिर रस्ता,चिश्तिया कॉलनी किंवा इतर रस्ते असतील तेथे हातगाडया,टप-या यांचे अतिक्रमण दिसून येते.रस्त्याने चालता येत नाही अशी परीस्थिती दिसून येते.जागा मालकांना मोबदला न देता तेथे अतिक्रमण होत असेल तर ही गंभीर बाब आहे. अशा वेळी प्रशासकीय विभाग का कार्यवाही करीत नाही.

श्री.हुशारसिंग चव्हाण :गेल्या दहा महिण्यापासून जीवा महाले यांचा पुतळा उभारण्या संदर्भात वारंवार उपोषण केलेली आहेत. पुतळा तयार असतांना कार्यवाही होत नाही खेदजनक बाब आहे. जीवा सेनेचे पदाधिकारी उपोषणास बसले आहे त्यांचे उपोषण सोडवावे. यापुर्वी या संदर्भात अंदोलन उपोषण झालेली आहे. तो पुतळा शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालयात बसवावा. १४ जानेवारी रोजी शिवाजी महाराज यांचा स्मृतीदिन आहे त्यापुर्वी हा पुतळा बसविण्यात यावा.तसे आदेश प्रशासनाला देण्यात यावे.

श्री.कृष्णा बनकर :छत्रपती शिवाजी वस्तु संग्रहालयाच्या जागेमध्ये तो पुतळा बसवायचा आहे. परवानगीची गरज नाही वेळ का लागत आहे.

श्री.विरभंद्र गादगे :या बाबतीत दिरंगाई होत आहे. १५ वर्षापासून हा प्रश्न प्रलंबीत आहे.यास कोण जबाबदार आहे.

मा.महापौर :एक एक विषयावर चर्चा व्हावी.एकाच वेळी कोणी बोलू नये. सभागृहात एकेकास बोलण्याची संधी देण्यात येते.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :रस्त्यावर वाहने उभी केली जातात. अनेक रस्त्याची कामे अर्धवट आहे.

श्री.महेश माळवतकर :पावसाळयापूर्वी डांबरीकरणाची कामे बंद केली, आता पावसाळा व आचारसहिंता संपलेली आहे. जी कामे मंजूर आहे, ती सुरू का केली नाही? टी.व्ही सेंन्टर मार्गे अण्णाभाऊ साठे चौक ते उध्द्वराव पाटील चौका पर्यंच्या रस्त्याचे व्हाईट-टॅपींगचे काम बंद केले.टी.व्ही सेन्टर ते जाधववाडी चौकापर्यंतचे कामासाठी बजेटमध्ये तरतुद आहे.ही कामे सुरू करणार की नाही.याचा खुलासा आयुक्तानी करावा.२-३ महिण्यानंतर पुन्हा आचारसंहिता लागणार आहे.कामे होणार की नाही सर्व खुलासा करावा.

श्रीमती प्राजक्ता भाले :बळीराम पाटील हायस्कूल ते बजरंग चौकापर्यंतच्या रस्त्याचे काम होत नाही. तेथील नागरीक उपोषणास बसणार आहे स्पील ओव्हर मधील कामे होत नाही कोणतेही काम प्रशासन करीत नाही. प्रशासन काम करण्यास गतिमान नसेल तर त्याचा धिक्कार करते.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :रिलायन्स कंपनीने केबल पाईप टाकण्यासाठी रस्ते खोदून ठेवले.तेथे अपघात होत आहे.केंव्हा बुजवणार आहे.

श्री.संजय केनेकर :सहा महिने आचारसंहितेमध्ये गेले कोणतेही कामे झाली नाही. पाणीपुरवठा,ड्रेनेज, अंतर्गत रस्ते या सर्व कामाचे नियोजन विस्कळीत झाले. प्रशासन कामे करण्यासाठी गतीमान नाही. विकास कामाच्या संचिका मंजूर करण्यासाठी आदेशीत करावे. चार महिण्यानंतर जनतेसमोर सामोरे जावे लागणार आहे ५० संचिका मंजूर केल्या तरी कामे होतील ३ महिणे आचारसंहितेला बाकी आहे.

श्री.बाळासाहेब मुंडे :माझ्या वार्डातील अनेक ठिकाणी सहा महिण्यापासून लाईट बंद आहे.हॉटेल दिपाली ते जयभवानी नगर रस्त्यावरील लाईट बंद आहे अनेकदा सुचना केली कार्यवाही होत नाही.

श्रीमती सत्यभामा शिंदे :निविदा झालेली कामे का सुरू होत नाही. त्यामुळे माझ्या वॉर्डातील बरीचशी कामे थांबलेली आहेत.

श्रीमती फिरदोस फातेमा खान:रोषनगेट ते आझाद चौक रस्त्याचे अनेक दिवसापासून काम चालू आहे. रस्ता रूंदीकरणासाठी लोकांनी स्वत:हून जागा दिल्या. काम पुर्ण होत नाही म्हणून अतिक्रमण वाढली. अतिक्रमण काढले जाते पुन्हा होते. जी जागा रस्त्यासाठी बांधीत आहे, तेथे तसे बोर्ड लावावे, तरच कुणी अतिक्रमण करणार नाही. रस्त्याचे काम ज्यांनी घेतले, त्यांना बील दिले जात नाही, म्हणून काम होत नाही असे समजते. माहिती घ्यावी. त्या रस्त्यातील अतिक्रमणे केंव्हा काढणार सर्व माहिती दयावी.

श्री.मुजीब खान :अतिक्रमण काढणे व डांबरीकरणाची कामे पावसाळा असल्यामूळे थांबली होती, ती अद्याप सुरू केली नाही.ही कामे का होत नाही महापालिकेची आर्थीक परीस्थिती कशी आहे विचारणा केली असता कामे झाली आहेत. आता देयके अदा करण्यात आलेले नाहीत. असे सांगण्यात येते. परंतु थांबलेली कामे होत नाही. ठेकेदारास बील दिले जात नाही. कामही होत नाही.

श्री.हुशारसींग चव्हान :आज पेपरला बातमी आहे .एमजीएम जवळ अतिक्रमण काढले परंतु त्या जागेवर पार्कींगचा वापर होत आहे.

या वेळी डायस समोर काही स.सदस्य एकाच वेळी मोठमोठयाने बोलत असतात. काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर :रस्ते, लाईट तसेच ड्रेनेज ची कामे का होत नाही महापालिकेची आर्थीक परीस्थिती कशी आहे काही स.सदस्यांनी प्रश्न माडंला.त्या बाबत खुलासा होणे गरजेचे आहे.

श्री.प्रमोद राठोड : कर्मचा-याचे पेमेंन्ट,बोनस जास्तीचा कामाचा मोबदला दिला नाही त्यामुळे दिवाळीच्या दिवशी साफसफाई झाली नाही रस्त्यावर नुसता कचरा दिसत होता. लोकांनी आमच्यावर नाराजी व्यक्त केली.दिपावलीच्या दिवशी साफसफाई होत नाही यापेक्षा लज्जास्पद बाब कुठली नाही. प्रशासन गंभीर नाही. या बाबत प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.गिरजाराम हाळनोर :मोठया रस्त्याची कामे सुरू होती, ती आज बंद आहे. दोन वर्षापासून प्रतापनगरच्या पुलाचे काम चालू आहे, अर्धे केले. प्रशासन आमची

बदनामी करायला निघाले काय? अनेक विकास कामाच्या संचिका प्रलंबीत आहे. साफसफाईचे काम का होत नाही. वसुली अधिकारी वसुली का करीत नाही. विकास होत नाही, म्हणून नागरीकांना समस्यांना तोंड दयावे लागते.

श्री.खाजा शरफोद्दीन :महापालिकेत चार उपआयुक्त आहे यांचेकडे काय काम दिले आहे? त्यांच्याकडे वसुलीचे कामे देण्यात यावी.

श्री.कृष्णा बनकर :दिवाळीच्या सणाला कर्मचारी यांना बोनस, जास्तीचे कामाचा मोबदला दिला नाही. म्हणून पाच दिवस साफसफाई बंद होती. अनेक ठिकाणी कचरा-यांचे ढिग पडले होते. यास कोण जबाबदार आहे.

या वेळी डायस समोर अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात. काहीही ऐकु येत नाही.

श्री.प्रमोद राठोड :दिपावलीच्या दिवशी काय परीस्थिती होती, यास प्रशासन जबाबदार आहे. अधिकारी काम करीत नसेल तर त्यांनी खुर्ची सोडावी.

मा.महापौर :स.सदस्यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे प्रशासनाने खुलासा करावा.

लेखाधिकारी (श्री.संजय पवार):सन २०१४-१५ चा अर्थसंकल्प प्रशासनाने ५४९ कोटीचा सादर केला होता.त्यात स्थायी समितीने वेगवेगळया प्रकारची उत्पन्नामध्ये वाढ सुचवून ११३ कोटीची वाढ केली, त्यानंतर सर्वसाधारण सभेने त्यात वाढ करून ७९० कोटीचे बेजेट केले.

श्री.गिरजाराम हळनोर :बजेट काय केले आम्हाला माहित आहे. प्रशासनाने वसुली किती टक्के केली ते सांगावे.

लेखाधिकारी(श्री.संजय पवार):५४९ कोटीचे प्रशासनाकडील बजेट होते. येणारे उत्पन्नाचा विचार करता अत्यावश्यक कामे होत आहे.

श्री.प्रमोद राठोड :सभागृहात सविस्तर मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

या वेळी डायस समोर मोठमोठयाने स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात. काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर :महापालिकेची आर्थीक परीस्थिती कशी आहे.कर्मचारी यांना दिवाळीसाठी बोनस, कामाचा मोबदला देऊ शकतो किंवा नाही. या परीस्थिती बाबत लेखाधिकारी यांनी खुलासा करणे. बरोबर वाटत नाही त्यापेक्षा सविस्तर उत्पन्नाबाबत सर्व खुलासा व्हावा.

श्री.मुजीब खान :विकास कामे का होत नाही व मनपाची आर्थीक परीस्थिती कशी आहे याची माहिती देणेसाठी लेखाधिकारी खुलासा करीत असतांना हसतात हे योग्य नाही, याचा अर्थ सभागृहाची मज्जाक उडवितात. असे अधिकारी आम्ही डायस समोर उभे राहू देणार नाही. असा प्रकार हे सभागृह सहन करणार नाही. असे अधिकारी लेखा विभागात असल्याने विकास कामे होत नाही. सभागृहाने बजेट केले आम्हाला माहित ओ प्रशासनाने काय केले? वसुली का केली नाही.विकास कामे का होत नाही,शहराचा सत्यानाश चाललेला आहे.

श्री.गजानन बारवाल :प्रशासनाकडून सविस्तर खुलासा घ्यावा.

मा.आयुक्त :ब-याच दिवसानंतर सभेचे कामकाज होत आहे. मी सुध्दा नवीनच आहे. आर्थीक परीस्थिती कशी आहे. हा प्रश्न समोर आला याविषयी आपणा

सर्वानाच माहित आहे. आवक किती व खर्च किती करायचा यांचा सुध्दा अंदाज घ्यावा लागतो. एलबीटी व इतर कर मिळून जवळपास २४ कोटीपर्यत महिण्याची आवक, इतके उत्पन्न यायला पाहिजे. असा अंदाज आहे. मला हरीयांना येथे निवडणूकीचे काम दिले होते एक महिणा तेथे होतो. आल्यानंतर कर्मचारी यांना बोनस व अनुदान देण्याचा प्रश्न होता. तो मार्गी लावला. परंतु उपायुक्त श्री.निकम यांनी चेकवर वेळेवर सही न केल्यामुळे बँकेत वेळेवर रक्कम जमा झाली नाही. दरम्यानच्या काळात सार्वजनिक सुट्टी आली. त्यामुळे उशीर झाला. यापुढे काळजी घेतली जाईल. बरीचशी कामे स्पील ओव्हरची आहे. स्पील ओव्हर म्हणजे जे काम मागच्या आर्थीक वर्षात सुरू झाले होते, व ज्यावर काही खर्च प्रत्यक्षात झालेला आहे. अशी कामे स्पील ओव्हर म्हणून पुढील वर्षात येते. ती अगोदर पुर्ण करणे आवश्यक आहे. स.सदस्यांची मागणी माझ्या वॉर्डातील कामे मंजूर करावी. माझ्याकडे येवून मागणी करतात. लोकाच्या अपेक्षा फार आहे नवीन कामे घेणे आवश्यक आहे किंवा घेतली पाहिजे अपेक्षा आहे. परंतु ऑलरेडी जी कामे हाती घेतली जी अर्धवट आहे. ती अगोदर केली पाहिजे. नसता काम न केल्यासारखे होते. क्वालीटी खराब होते. पुढे अडचणी निर्माण होतात. छोटे ठेकेदाराची बीले थांबलेली होती दिवाळीच्या दरम्यान त्यांना सुध्दा न्याय देणेचा प्रयत्न केला. ४० टक्के पेमेंन्ट दिले. बी-१ व मोठे इन्फ्रास्ट्रक्चरचे जे काम त्यात व्हाईट टॅपींग, नवीन रस्त्याचे काम असेल. जसे क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन रस्ता आहे. अशी मोठी कामे करणे गरजेचे आहे. ही कामे केली नाही तर नागरीकांना त्रास होतो. अशी कामे सुरू आहे. कालच बातमी आली की सलीम अली सरोवर पासून टी.व्ही सेंन्टरकडे जाणारा रस्त्याचे काम सुरू केले.

श्री.महेश माळवंतकर :व्हाईट टॅपींग रस्त्याचे काम का बंद आहे.

मा.आयुक्त :व्हाईट टॅपींग चे कामे ही टप्प्या टप्प्याने सुरू होतील.रिलायन्स मुळे रस्त्यावर जे खड्डे पडले. याबाबत संबधीत एजन्सीला बोलवून चर्चा करून निर्णय घेतला जाईल.सर्वच काम करण्याचे प्रयत्न सुरू आहे.अर्धवट कामे पुर्ण करून घेण्यात येतील. हा तांत्रिक मुद्दा आहे शहर अभियंता याबाबत सविस्तर खुलासा करतील.

श्री.त्रिंबक तुपे :रिलायन्स कंपनीने खोदकाम केले त्या बदल्यात काम करायचे त्यासाठी महापालिकेला पैसे दिले ती कामे का होत नाही.

श्री.अनिल जैस्वाल :जे काम झाले त्या ठेकेदाराची बीले का दिले जात नाही. त्यामुळे ठेकेदार कामे करीत नाही.

श्री.नासेर खान :प्रशासनाकडून खुलासा होतो. परंतु काम पुर्ण केले जात नाही. काम होणार की नाही. ठोस निर्णय घ्यावा स्पीलची कामे किती केली. माझ्या वार्डातील काम का बंद आहे. अधिकारी यांना फोन केला तर उचलत नाही.उडवा उडवीची उत्तरे मिळतात ही बाब गंभीर आहे.

श्री.मुजीब खान :बजेटमधील किती कामे झाली. आवक कमी असेल तर वसुली का होत नाही, यास प्रशासन जबाबदार आहे. विकासाची कामे होत नसेल तर अर्थ नाही. रिलायन्स कंपनीने रस्ते खोदून ठेवले. त्या कंपनीने मनपाला

पैसे दिले तर तेही काम होत नाही. प्रशासन जाणूनबूजून महापालिकेत राजकारण करीत आहे. यामूळे विकास दिसून येत नाही. सभागृहात अधिकारी हसूण मज्जाक उडविण्याचा प्रकार होत आहे तो गंभीर आहे. मा.आयुक्तांनीही प्रत्यक्ष बघीतले हे आम्ही सहन करणार नाही.अशा अधिका-यावर कार्यवाही करायला पाहिजे. यापुर्वीचे तत्कालीन मा.आयुक्त यांनी संबधीत लेखाधिकारी यांचे संचिकेवर क्लिअर लिहिले आहे की या पदावर हे अधिकारी देवू नये असे असतांना हे अधिकारी पुन्हा कसे, त्या जागेवर येतात. अधिकारी सभागृहाचा मानसन्मान ठेवत नाही. १०० मधील किमान १० कामे तरी चांगली व वेळेवर होणे आवश्यक आहे. विकास कामे होण्यासाठी ठोस निर्णय व्हावा.

श्री.गिरजाराम हळनोर :मुख्यलेखाधिकारी शासनाचे अधिकारी आहे. त्यांचेकडे कोणते काम दयायला पाहिजे, कोणते काम करतात. त्यांची जबाबदारी काय आहे. याबाबतचा खुलासा प्रशासनाने द्यावा.

मा.महापौर :योग्य खुलासा करावा माहित नसेल, तर सभागृहाचा वेळ वाया घालवू नये.

श्री.नागरे किशोर :मुख्यलेखाधिकारी यांचेकडे काय काम आहे. त्यांचे अधिकार काय आहे.

मुख्यलेखाधिकारी :मी मुख्यलेखधिकारी म्हणुन रूजू झाल्यानंतर लेखा विभागाचा संपूर्ण कार्यभार माझ्या हाती येतात.पुर्वी धनादेशाचे अधिकार माझ्याकडे होते. मी रजेवर गेल्यानंतर मा.आयुक्तांनी हे अधिकार श्री.दुर्रानी यांचेकडे दिले त्यानंतर ते श्री.संजय पवार यांचेकडे देण्यात आले. त्यानंतर लेखा शाखेत संचिका येतील त्याची जबाबदारी माझी आहे.रिसीप्ट आणि एक्सपेंडीचर खर्चाची जबाबदारी लेखाधिकारी यांचे वर होती.धनादेश तेच लिहितात तेच या संबधीत खुलासा करू शकतील.

श्री.गिरजाराम हळनोर :संबंधीत मुख्यलेखाधिकारी काय खुलासा करत आहेत. हे बरोबर नाही.

श्री.प्रमोद राठोड :प्रशासनाचा लेखा विभागावर वचक नाही. काय चालले आहे हे. योग्य माहिती दयावी.

मा.आयुक्त :श्री.थोरात हे मुख्यालेखाधिकारी आहे. श्री.पवार व बाकीचे अधिकारी त्यांचे अंतर्गत काम करतात. जो खुलासा केला तो पटलेला नाही. मुख्यलेखाधिकारी यांचेकडील जे अधिकार होते ते का काढून घेतले? याचा अभ्यास करावा लागेल. त्यानंतर योग्य निर्णय घेण्यात येईल. महापालिकेचे कामकाज सुरळीतपणे चालले पाहिजे.

या वेळी एकाच वेळी डायस समोर स.सदस्य बोलत असतात. त्यामुळे आवाज स्पष्टपणे ऐकू येत नाही.

श्री.मुजीब खान :श्री.संजय पवार यांचे बाबतीत चर्चा झाली.सभागृहाचा अपमान झाला त्यांचे बाबतील पुरवणी विषय पत्रिकेवर त्यांचा पदभार काढण्याचा ठराव आहे तो मंजूर करावा. त्यांना आजच्या आज कार्यमुक्त करावे.

श्री.अनिल जैस्वाल :हा निर्णय आताच व्हावा. ठराव मंजूर करावा.

श्री.रावसाहेब गायकवाड:ठरावास मंजूरी दयावी.

मा.महापौर : लेखा विभागावर ब-याच वेळापासून चर्चा चालू आहे. विकास कामे होत नाही. ही स.सदस्यांची भावना आहे. यामूळे शेवटी हा सर्वांनाच त्रास होतो. विकास कामे व्हावी यासाठी बजेट मध्ये कामे टाकलेली घेतलेली आहे. अधिकारी यांचेमूळे स.सदस्यांना त्रास होत असेल तर योग्य नाही त्या बाबतीत निर्णय झाला पाहिजे. हा निर्णय एक मताने झालेला आहे विषय क्र.६५७ मध्ये श्री.संजय पवार यांचेकडील लेखाधिकारी पदाचा चार्ज काढण्याचा ठराव आहे त्यास मंजूरी देण्यात येते.

**विषय क्रमांक ६५७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेत लेखाधिकारी पदाची शैक्षणिक आर्हता धारण न केलेले तसेच तात्कालीन विभागीय आयुक्त तथा मनपा आयुक्त यांनी श्री.संजय पवार यांच्या सेवापटात त्यांना पुन्हा लेखा विभागात नियुक्ती न देण्यास लिहीलेले असतांना ही त्यांना मनपा मध्ये काही अधिकारीच्या मर्जीने त्यांना पुन्हा लेखाधिकारी पदावर नियुक्ती दिलेली आहे.

संबंधितांच्या काळात लेखा विभागात अनेक प्रकरणे झालेली असून त्या बाबत दैनिक वर्तमान पत्रात अनेक बातम्या सुध्दा आलेले आहे व त्यामुळे मनपाची बदनामी झालेली आहे. तसेच दिपावलीच्या काळात कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन करून ही त्यांना पगार आणि बोनस ही वेळेवर न दिल्याने त्यांची दिपावली अंधारात साजरी करण्यात आलेली आहे. कर्मचाऱ्यांना अतिरीक्त कामाचा मोबादला तसेच सार्वजनिक सुट्टीच्या काळात काम केल्याचा मोबादला अनेक वर्षापासून देण्यात आलेला नाही.

तसेच पुढे महानगरपालिकेची निवडणूक होणार असून गुत्तेदारांना पुर्वी केलेल्या कामाचे आज पर्यंत देयक मिळालेले नसल्याने ते यापुढे अनेक वॉर्डात विकासाचे व दैनंदिनी देखभाल दुरूस्तीची कामे करण्यास तयार नाही यामुळे पुढे अनेक ठिकाणी अडचणी वाढणार असून स.नगरसेवकांनी जनतेसमोर कसे जावे हे समजत नाही. तसेच आज ही अनेक गुत्तेदार त्यांच्या अनागोंदी कारभारामुळे धनादेशापासुन वंचित राहावे लागत आहे.

करीता श्री.संजय पवार यांच्याकडून लेखाधिकारी पदाचा कार्यभार तात्काळ काढण्यात यावा म्हणुन प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक :-** श्री. रावसाहेब गायकवाड **अनुमोदक :-** श्री. अनिल जैस्वाल श्री.मोहन मेघावाले

मा.महापौर : सभागृहात ऐनवेळेच्या झालेल्या चर्चेनुसार व केलेल्या मागणीनुसार श्री.संजय पवार, लेखाधिकारी यांच्याकडील लेखाधिकारी पदाचा व एल.बी.टी.मध्ये कार्यरत असलेल्या कार्यभाराचा सुध्दा चार्ज काढून घेण्यात यावा.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेत लेखाधिकारी पदावर श्री.संजय पवार हे कार्यरत असून संबंधितांच्या काळात लेखा विभागात अनेक अनागोंदी प्रकरणे झालेली असून त्या बाबत दैनिक वर्तमान पत्रात अनेकवेळा बातम्या आल्या त्यामुळे मनपाची बदनामी झालेली असल्याने आणि सभागृहात ऐनवेळी स.सदस्यांनी केलेली चर्चा व मागणीनुसार श्री.संजय पवार यांच्याकडून लेखाधिकारी पदाचा कार्यभार तात्काळ काढुन घेण्यास तसेच एल.बी.टी. येथील कार्यभार सुध्दा काढून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.गिरजाराम हळनोर :मागिल बैठकीत अतिक्रमण काढणे बाबत आदेशीत केले होते अदयाप कार्यवाही केली नाही. राजाबाजार,गुलमंडी, शहानुरवाडी भाग असेल येथे अनधिकृत दुकाने हातगाडया टप-या बसलेल्या आहेत या रस्त्यावर ट्राफिक जाम होते अपघात झालेले आहे. तेथील अतिक्रमण काढण्याचे आदेशीत केले ते केंव्हा काढणार आहे.

श्रीमती प्राजक्ता राजपूत:औरंगपूरा भाजी मंडई,गुलमंडी,भागात मोठया प्रमाणात रस्त्यावर हातगाडया उभ्या असतात.तात्काळ हटवावे तसेच जळगाव टी पॉईन्ट हायवे रस्त्यालगत सेंन्ट जॉन हायस्कूल जवळ गुरूदत्त हॉऊसींग सोसायटीकडे जाणा-या रस्त्यावर उंट पाळणारे लोकांनी पत्र्याचे शेड लावले व अतिक्रमण केले. उघडयावर ते लोक शौचालयास बसतात. बाजूच्या नागीरकांना दरवाजे बंद करून बसावे लागते घाण करतात सदर ठिकाणचे अतिक्रमण त्वरीत हटवावे.

श्री.गजानन बारवाल :आताच सुचना केल्याप्रमाणे संबधीताने प्लॉटच्या बाजूला अतिक्रमण केले ते काढावे तसेच औरंगपुरा भाजीमंडई बाजूला अनेक हातगाडया उभ्या असतात. भाजी मार्केट मधील दुकानदार यांना पर्यायी जागा दिली आहे. तेथील अतिक्रमण काढावे.

श्री.सुर्यकांत जायभाये :गजानन महाराज मंदीर दुभाजकावर विक्रेते बसतात दुभाजकाची रूंदी कमी करून अतिक्रमण काढावे. पुंडलिकनगर कडे जाणा-या रस्त्यावर हातगाडया टप-या होऊन अतिक्रमण झालेले आहे.

श्रीमती साधना सुरडकर:शहानुर मियॉ दर्गा जवळ ब्रीजच्या बाजूला भाजी विक्रेत्याची संख्या वाढली आहे तो अरूंद रस्ता आहे. वाहतूकीत अडथळा निर्माण होतो मोठे अपघात होत आहे. येथे आर्थीक बाकीचा विषय नाही. फक्त कर्मचारी पाठवून अतिक्रमण हटविले जात नाही. सभागृहातील माईकचा आवाज स्पष्ट येत नाही. स्वच्छतेच्या कामासाठी खर्चाची गरज नाही. कर्मचारी पाठूवन स्वच्छता व्हायला पाहिजे,प्रेशरने पाणी उंच भागात पाणी येत नाही. काही ठिकाणी गढूळ पाणी येते. ही सुध्दा कामे होत नाही.मागिल बजेट मधील वर्क ऑर्डर दिलेली असतांना ठेकेदार काम करीत नाही. ठरवून दिलेल्या कालावधीत काम केले जावे.दर्गा जवळील ब्रीजच्या बाजूला खोदून ठेवले. काम अर्धवट ठेवले. तेथे जीवीतहानी होण्याची वाट बघतो काय? याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्रीमती सत्यभामा शिंदे :एजन्सी फिक्सींग झालेले काम सुध्दा होत नाही.त्या संचिका कुणाकडे आहे.

श्रीमती छाया वेताळ :माझ्या वार्डात मारोती मंदीर रस्त्याजवळ अतिक्रमण झाले अधिकारी यांना फोन केला तर उत्तर मिळत नाही. फोन घेत नाही. अतिक्रमण केंव्हा काढणार आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :अनेक विषयावर चर्चा झाली,यापुर्वीही अतिक्रमण, पाणीपुरवठा, रस्ते संदर्भात चर्चा झाली होती सन २०१४-१५ चा अर्थसंकल्प सादर केला मा.आयुक्तांना ३५ वर्ष कामाचा तर आम्हाला २५ वर्षापासून सदस्य म्हणून अनुभव आहे.बजेट करतांना आवक व जावक किती याचा

ताळमेळ ठेवणे आवश्यक आहे. पैसे नाहीत असे म्हणून बजेट मधील कामे करणारच नाही असे म्हणणे योग्य नाही. काम करतांना अनियमितता होत असेल तर त्या कामांना कात्री लावावी तो अधिकार आयुक्तांना आहे. पावसाळा संपला व्हाईट-टॅपींग रस्त्याचे काम सुरू होणार होते या संचिका मंजूर व्हाव्यात.पैसे नसतांना काही आवश्यक कर्तव्य पार पाडावी लागतात. पैसा उपलब्धतेसाठी नवीन सरकार स्थापन झाले आहे. वेगवेगळया योजनाचा निधी मागवावा.स्पील ओव्हरची कामे ही मागिल वर्षातील असतात. ती पुढे करीत रहावी. हे पुर्वी पासून चालत आलेले आहे.विविध एजन्सीचे देणे होते म्हणून कर्मचारी यांना त्यांचे हक्काचे पगार, बोनस ॲडव्हान्स देवू शकलो नाही.कर्मचा-यांच्या भावनेची कदर केली पाहिजे. टेक्नीकल अडचणी असतील त्या संचिका मंजूर करू नये.परंतु जी विकास कामे करणे आवश्यक आहे त्या संचिका मंजूर कराव्यात. ठेकेदाराची बीले देणेचे काम लोकप्रतिनिधीना सांगावे लागते. हे बरोबर नाही.सर्व वार्डात कामे व्हावी. दैनिक माध्यमातून दररोज मनपाच्या बातम्या येतात त्या सत्य आहे.त्याची दखल घेत विकास कामे करावी अशी अपेक्षा आहे.

श्री.गजानन बारवाल :नेहरूभवन येथील मनपाच्या जागेवर कर्मचारी यांनी अतिक्रमण केले. या बाबत खुलासा घ्यावा.

उपआयुक्त(मा.म) : शेख जावेद यांचे वडील मनपामध्ये हे वाहन चालक होते. त्यांना निवासस्थान दिले होते. त्यांचे निधन झाल्यानंतर कुटूंबीयास राहण्यासाठी स्थायी समितीच्या मंजुरीने परवानगी दिली. परंतु खुल्या जागेवर मयत कर्मचारी यांचे मुलाने व्यावसायीक दृष्टया बेकायदेशीर बांधकाम सुरू केले होते.सदरचे काम थांबविण्यात आले. पुढील कार्यवाही होत आहे.

मा.आयुक्त :उपआयुक्त हे नवीन आहे मी स्वतःया प्रकरणात लक्ष देवून कार्यवाही केली जाईल.

श्री.त्रिंबक तुपे :मनपाचे जागेवर शॉपींग, हॉल, समाजमंदीर अनेक वर्षापासून रिकामे पडलेले आहे. तेथे अतिक्रमण होत आहे. या ठिकाणी अवैध धंदे चालतात अशा मालमत्ता महापालिकेने ताब्यात घेवून भाडेतत्वावर देण्यात याव्यात.

श्री.प्रफुल्ल मालाणी :जुन्या शहरातील १४ रस्ते रूंदीकरण करण्याचे काम हाती घेतले. अनेक लोकांनी त्याच्या मिळकती मनपाकढे दिल्या लोकांना मोबदला टीडीआर दिला.रस्ते रूंद केले परंतु आज रोजी त्या रस्त्यावर पार्कींग, हातगाडया टप-या बसलेल्या दिसतात. निरालाबाजार भागात टुव्हिलर वाहन जावू शकत नाही अशी परीस्थिती आहे.यात मा.आयुक्तांनी लक्ष द्यावे.

श्री.मोहन मेघावाले :वार्ड ब अंतर्गत ह्रडको सिडको भाग येतो वसुली चांगली असतांना या भागात विकास कामे होत नाही.हा अन्याय होतो.उध्दवराव पाटील चौक ते अण्णाभाऊ साठे चौका पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट-टॉपींगचे काम चालू

होते अचानक बंदं पडले.जे काम केले ते वाया गेले.नागरीकांनी आम्हाला निवडून दिले.ठेकेदाराने काम केले व त्यांचे बिल दयावे असे सदस्यांना सांगावे लागत असेल व बील दिल्यानंतर ते अधिकारी टाळया वाजून हजर बोलत असेल तर हे योग्य नाही.असे अधिकारी यांचेवर कार्यवाही झालीच पाहिजे.हस्तांतर होत होते त्यावेळी नागरीक आनंदीत होते.परंतु आता कोणतीही कामे होत नाही.उपआयुक्तांच्या चुकीमुळे कर्मचा-यांना पैसे असतांना पगार, बोनस ॲडव्हॉस वेळेवर दिले नाही.त्यामुळे दिवाळीच्या दिवशी साफसफाई बंद होती.अतिक्रमणाचा विषय समोर आला ते काढले पाहिजे.माझ्या वार्डातील श्री.झनझन यांनी अतिक्रमण काढले. त्यांचे अभिनंदन करायला पाहिजे.माझ्या वार्डातील विकास कामाच्या संदर्भात जे.ई.श्री.पाडळकर यांनी टाळाटाळ करतात सदस्यांना खोटे बोलता हसण्यावर नेतात ही पध्दत बरोबर नाही त्यांचेकडील चार्ज तात्काळ काढावा.

शहर अभियंता :स.सदस्य यांनी सुचना केल्याप्रमाणे तेथील कामाच्या बाबतीत मी स्वत:चौकशी करून कार्यवाही केली जाईल.

श्री.अ.रऊफ खान :नारेगांव येथील अतिक्रमण हटविले परंतु तेथील जागे संदर्भात स्टे ऑर्डर होती का?

मा.महापौर :रस्ता रूंदीकरण मोहिम हाती घेतली कामे पुर्ण झाली नसल्याने त्या रस्त्यावर टप-या हातगाडयाचे अतिक्रमण केल्याचे दिसून येते. स.सदस्यांनीही अनेक तक्रारी केल्या. यापुर्वीच्या बैठकीत यावर चर्चा केली. कार्यवाहीचे आदेशीत केले. कार्यवाही केली नाही.रेल्वेस्टेशन भागातील भाजीमंडई तेथ्रील लोकांना पुर्ण कालावधीची सुचना न देता काढण्यात आले.स.सदस्य जेंव्हा सांगतात की,गजानन महाराज मंदीर रोड,शिवाजीनगर,शहागंज भाग,शहानुरमियॉ दर्गा,भावसिंगपूरा पडेगाव नारेगाव आंबेंडकरनगर रोड सिडको हडको हर्सुल व इतर भागातील अतिक्रमण काढावे ते का काढले जात नाही. याबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

श्री.त्रिंबक तुपे :मनपाच्या ओपनस्पेसवर दुकान, हॉल येथेही अतिक्रमण झाले तोही खुलासा करावा.

प्रशासकीय अधिकारी :रेल्वेस्टेशन येथील भाजीमंडई संदर्भात तत्कालीन मा.आयुक्त व विद्यमान आयुक्त यांची मान्यता होती. त्यानुसार १ महिणा अगोदर नोटीस दिल्या. त्या संबधीतांनी घेतल्या नाही. म्हणून त्या जागेवर चिटकवल्या त्यानंतर कार्यवाही केली.

श्री.गजानन बारवाल :५० वर्षापासूनची भाजीमंडई आहे. नोटीस दिली आणि लगेच काढले वेळ दिला नाही. इलिगल बसलेले नव्हते. प्रशासनाने विचार केला नाही.

प्रशासकीय अधिकारी :या बाबत जागेवर रितसर नोटीस डकविण्यात आली होती. कार्यवाही करावी २४ पत्र आलेले होते. नारेगांव येथील शाळेच्या राखीव जागेवर ७-८ लोकांनी १५ ते २० वर्षापासून बांधकाम केलेले होते त्या बाबत

संबधीतांस नोटीस दिली होती १ वर्षापासून संचिका कार्यवाहीस्तव होती संबधीतास सुनावणीसाठी बोलविले.विधी सल्लागार यांची मान्यता घेवून कार्यवाही केली.शिवाजीनगर हनुमान मंदीर जवळ झालेले अतिक्रमणा बाबत तीन वेळेस कार्यवाही केली. २०-३० हातगाडया जप्त केल्या होत्या.पुन्हा अतिक्रमण झालेले असेल तर सर्व ठिकाणचे १५ दिवसात कार्यवाही केली जाईल.तसेच टी.व्ही सेंटर येथील कार्यवाही केली जाईल.

श्री.खाजा शरफोद्दीन :सिडको मध्ये एका इमारतीवरील मजला काढण्यासाठी कोर्टाने आदेश दिले. अद्यापही कार्यवाही केली नाही.

प्रशासकीय अधिकारी :८ दिवसात कार्यवाही करण्यात येईल.

मा.उपमहापौर :गजानन महाराज मंदीर रस्त्याचे काम पुर्ण केले. या रस्त्यावर २५-३० दुकाने अनधिकृत आहे. भाजीवाले रस्त्यावर गाडया लावतात. शिवाजीनगर, शहांगज भाजी मंडईची ही परीस्थिती आहे. १० वेळेस कार्यवाही केली. त्यानंतरही पुन्हा अतिक्रमण होत असेल, तर त्यांचे वर पोलीसात गुन्हे दाखल करावे.कैलासनगर रस्त्यावर मोठा खर्च केला. किराणा चावडी रस्ता बंद झाला. एमजीएम कडे जाणा-या रस्त्यावर मोठे अतिक्रमण आहे.ही सर्व कार्यवाही वेळीच होणे आवश्यक आहे.

श्री.प्रमोद राठोड :प्रत्येक वेळेस अतिक्रमण काढण्यास मा.आयुक्तांच्या सहीची गरज नाही. प्रशासकीय कार्यवाही तातडीने करावी. विलंब लावल्यास समोरचा व्यक्ती कोर्टात धाव घेतो.

प्रशासकीय अधिकारी :किरकोळ स्वरूपाचे अतिक्रमण काढण्यासाठी प्रशासनाची मान्यता घेत नाही.

श्री.कृष्णा बनकर :१५ वर्षापुर्वी ७० लक्षमध्ये भावसिंगपूरा येथील ११ एकर जागा मनपाने घेतली होती.त्या जागेवर अतिक्रमण होत आहे. ६७-सी नुसार तार कंपाऊंडसाठी काम मंजूर केले काम सुरू केले नाही.

शहर अभियंता :या जागेला तार फिन्सींग करणे आवश्यक आहे.मा.आयुक्तांनी मान्यता दिली होती लवकरच काम होईल.

श्री.मिलींद दाभाडे :बारापुल्ला गेट,मकईगेट,पानचक्की जवळील गेट मध्ये वाहतुकीची कोंडी होते.कुणीही लोकप्रतिनिधी याकडे लक्ष देण्यास तयार नाही.या गेटच्या बाजूचे पुलाचे काम होण्यासाठी बजेटमध्ये तरतूद करून करावे. यासाठी उपोषण केले १७ हजार नागरीकांनी काम व्हावे. म्हणून उपोषण व सह्या करून नोंद दिली. या कामासाठी निधी द्यावा. म्हणुन मागणीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला कार्यवाही केली नाही. तरी पाठपुरावा करून हे काम तातडीने कसे होईल याकडे लक्ष दयावे.टेंडर झाले नाही बजेटमध्ये तरतूद केली नाही.

शहर अभियंता :एकूण २४ कोटीचा खर्च यासाठी लागणार. माजी अर्थमंत्री यांनी निधी उपलब्ध करून देणे बाबत मा.मंत्रीमहोदय श्री.अजीत पवार यांचेशी प्रत्यक्ष चर्चा झाली होती. निधी देण्याचे आश्वासन दिले होते. यासाठी अर्थसंकल्पात तरतुद करण्यासाठी पाठपुरावा चालू आहे.

मा.उपमहापौर :शासनाकडील अनुदान प्राप्त करून घेणेसाठी व त्या संबधीचा संपुर्ण पाठपुरावा करण्यासाठी स्वतंत्र अधिकारी नियुक्त करावे.

श्री.नासेर खान. :मस्जीद मध्ये कार्यक्रमासाठी १००० लि.पाण्याची गरज होती. मागणी केली असता, अधिकारी एक दुस-याचे नाव सांगतात. पाणी दिले नाही. ही परीस्थिती का निर्माण झाली?

श्री.कृष्णा बनकर :प्रशासकीय इमारतीमध्ये पाणी नाही. त्यामुळे कार्यालयात वापराचे, पिण्याचे पाणी मिळत नाही. ही परीस्थिती येणे दुर्दैव आहे.

मा.आयुक्त :पाणी पुरवठा योजना आपण समांतरकडे हस्तातर केली. देखभाल,पाणी वाटप तसेच वसुलीचे काम कंपनीकडे दिले आहे. महापालिकेला पाण्याची गरज असेल तरी त्याचे बील अदा करावे लागणार आहे.असे ॲग्रीमेंन्ट केले आहे.

श्री.त्रिंबक तुपे :पाणी पुरवठा संबधीची कामे समांतर एजन्सी करेल असे सांगण्यात येत असे,परंतु ज्या कामाचे टेंडर झाले मा.आयुक्तांची मंजुरी आहे. ते सुध्दा कामे सुरू केली नाही.तान्हाजी चौकातील जलवाहिनीतून पाणीपुरवठा वाढवावा अशी मागणी तेथील महिला घेवून येतात. हे काम समांतर एजन्सीला सांगितले. महापालिकेच्या अधिका-याकडे करण्याचे सुचिविले परंतु केले जात नाही.वॉल टाकण्यासाठी १५ दिवस लागतात.नवीन लाईनची कामे व्हावी.देखभाल दुरूस्तीचीही कामे सुरू करावी चोकअप काढण्याचे काम सुध्दा आता तातडीने होत नाही ही परीस्थिती असेल तर योग्य नाही.गढूळ पाणी येते. तरी एजन्सीचे लोक सांगतातकी पाणी पिण्या योग्य आहे.असे असेल तर महापालिकेचे नियत्रंण त्या एजन्सीवर आहे की नाही. जी कामे थांबलेली आहे ती निकाली काढावी.

श्री.कृष्णा बनकर :अनेक भागात पाणी येत नाही टॅंकरची मागणी केली तरी देत नाही ही परीस्थिती का निर्माण झाली प्रशासन गाभीर्याने घेत नाही.

मा.उपमहापौर :समांतर एजन्सीकडे काय हॅंडवर्क केले अटी शर्ती काय आहे सर्व माहितीसाठी स.सदस्यासाठी स्पेशल बैठक आयोजित करावी.

श्री.कृष्णा बनकर :भुमिगत ड्रेनेज लाईनचे काम केंव्हा चालू होणार आहे.

श्री.महेश माळवतकर :समांतरकडे पाणीपुरवठा दिल्यापासून नागरीक त्रस्त आहे जे लोक पाणी पट्टी भरणा करतात तेथे पाणी येत नाही.नळ कनेक्शनसाठी एक महिणा लागतो ही परीस्थिती आहे.सिडको हस्तांतर केले मोठी कोणतीही कामे येथे करायची गरज पडली नाही. परंतु छोटी कामे सुध्दा करण्यास टाळाटाळ होते. ड्रेनेज लाईनचे चोकअप काढले जात नाही. सदस्यानी सांगितलेले काम होत नाही जनतेचा रागाचा उद्रेक झाल्यास झाल्यास प्रशासनाला जागेवर बसणे कठीण होईल.अशा वेळी प्रशासन यास जबाबदार असेल.

श्री.मीर हिदायत अली :मनपाचे टॅंकर समांतर एजन्सीकडे वर्ग केले काय? देखभाल दुरूस्तीसाठी ज्या ठिकाणी १-२ फुट पाईप टाकण्याचे काम पडते तेथे जी आय पाईप न टाकता सिमेंट पाईप टाकत आहे त्यास शासनाने बंदी घातली आहे.

कार्य.अभियंता (पापू) :समांतरकडे मनपाचे १२ टॅकर हस्तांतर केले त्यावरील वाहनचालक हे मनपाचे कामासाठी आहे.करारनाम्यानुसार ते दिले आहे.

श्री.कृष्णा बनकर :समांतर कडे योजना हस्तांतरीत करतांना काय काय हँडवर्क केले करारनामा काय आहे सर्वांना माहिती दयावी.

कार्य.अभियंता (पापू) :या बाबतची माहिती इंन्टरनेटवर टाकण्यात आली आहे.

मा.उपमहापौर :पाईप लाइन अगोदर त्यानंतर पाणी वसुली करावी परंतु आधी वसुली व नंतर पाणी असे एजन्सीचे धोरण आहे काय? या बाबतीत एक बैठक आयोजित करणे आवश्यक आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :हप्त्यापोटी मोठी रक्कम समांतरला देतो. कर्मचारी दिले .२०-३० लक्ष त्यावरचा खर्च येतो. असे असतांना कोणत्याही प्रकारचे काम होत नाही एजन्सीने कोणतेही मटेरियल आणलेले दिसून येत नाही. एन-७ सी सेक्टरमध्ये १२३ घरांना पाणीपुरवठा होत नाही. कंपनीला अधिकार देवून टाकले. फोन केला उचलत नाही. काम अदयाप सुरू केले नाही.

श्री.त्रिंबक तुपे :देखभाल दुरूस्तीचे किमान काम वेळेवर केले जावे.

श्री.प्रमोद राठोड :माझ्या वार्डातील नागरीक पाणीपट्टी रेग्युलर भरतात असे असतांना थकबाकी दाखवली जाते विचारणा केल्यास पावती दाखवावी अशी मागणी होते महापालिकेकडे याचा रेकॉर्ड नाही का? संबंधीत वॉर्ड अधिकारी व अभियंता विभागातील कर्मचाऱ्यांना याबाबत समज द्यावी.

कार्य.अभियंता(पापू) :असा प्रकार होत असेल तर वार्ड अधिकारी यांना सुचना देवून त्या बीलाची तपासणी करून कार्यवाही होईल.

मा.महापौर :ठिक आहे. आता पुढील चर्चा समांतर संदर्भात सखोल चर्चा करण्यासाठी विशेष बैठक आयोजित केली जाईल.

श्री.त्रिंबक तुपे :पाणी पुरवठयाचे नवीन कामे होणार की नाही?

कार्य.अभियंता(पापू) :समांतर एजन्सीकडून नवीन कामे १५ तारखेनंतर सुरू करणार आहे.हायड्रोलिक डिझाईन देणार आहोत.देखभाल दुरूस्तीचे कामे तातडीने करीत आहोत.नवीन कामे केल्यास ती तो खर्च वाया जाईल.

श्री.त्रिंबक तुपे :जे ड्रॉईंग महापालिकेचे काढले ते समांतर एजन्सीकडे सादर करून नवीन पाणी पुरवठयाची कामे तात्काळ सुरू करावी.

श्री.मीर हिदायत अली:अशोकनगर भागात ६ महिण्यापासून घाण पाणी येते अनेक वेळा निदर्शनास आणून दिले.१३ लक्षचे अंदाजपत्रक तयार केले होते.काम पुर्ण केले नाही समस्या सुटलेली नाही. श्रीमती रोकडे यांचा मृत्यू झाला एक मुलगा आज ॲडमिट आहे काम झाले नाही, तर मी स्वत:संबधीत अधिकारी यांचेवर गुन्हे दाखल करील.

श्रीमती प्रिती तोतला :अंगूरीबाग या भागात पाणी येत नाही. त्या भागात रस्त्याचे काम चालू आहे. अगोदर लाईन टाकावी पुन्हा रस्ता खोदावा लागणार नाही असे कळविले असता, रस्त्याचे काम करून घ्यावे. तो लाईन टाकण्यासाठी खोदून घेवू. अशी उत्तरे कंपनीकडून मिळतात. ही परीस्थित असेल तर कामे होतील का अशी शंका निर्माण होते.

कार्य.अभियंता(पापू) :मी स्वत: लक्ष देवून या बाबत कार्यवाही केली जाईल.

श्री.किशोर नागरे :ज्या ज्या वार्डातील कामे मंजूर आहे, ती सुरू करावी. आचारसंहिता लागण्यास तीन महिणे आहे. या कालावधीत कोणती कामे करायची यांचे नियोजन करून कार्यवाही करावी. तसेच कचरा उचलणे, पाणी सोडणे यासाठी लगेच खर्च करण्याची गरज नाही. अशी कामे तातडीने व्हायला पाहिजे. व्हाईट-टॅपींग रस्त्याची कामे तसेच अनेक भागात लाईट बंद आहे. याची यादी तयार करावी. सर्व कामे तात्काळ करण्यात यावी.स्पील ओव्हरची कामे मार्गी लावावी. नवीन कोणती कामे करणार याची, माहिती दयावी. अतिक्रमण काढतांना प्रोग्राम ठरवल्यानंतर गोपनीयता पाळली जात नाही.जेथील अतिक्रमण काढणार त्यापुर्वी लोकांना माहिती मिळते. हे योग्य नाही.

श्री.जंहागीर खान :कटकटगेट रोडवरील मागील बाजूकडून राममंदीर सिडको भागाकडे जाणाऱ्या रस्त्यावर सदफ कॉलनी मध्ये मनपाच्या ओपनस्पेसवर वाळू,खंडी बांधकाम साहित्य टाकले जाते व तेथून खरेदी विक्री व्यवहार केला जातो. तसेच जाधववाडी भाजी मंडई येथील गाळे धारकांबाबत कराच्या बाबतीत निर्णय घेता येईल. असे म्हटले होते. या बाबत कार्यवाही व्हावी.

श्री.अनिल जैस्वाल :माझ्या वार्डात चेंबर मधील पाणी नालीमध्ये जात आहे.जेथे साफसफाई होते तेथील कर्मचारी यांना झाडू टोकरा, हॅडसॉक्स बुट व आवश्यक साहित्य दिले जात नाही.कचरा उचलतो तेथे टाकण्यास जंतुनाशक पावडर नाही.माझ्या वार्डात ५ डेंग्युचे रूग्ण आहेत.

श्री.गोपाळ कुलकणी :पैठणगेट भागात डेंग्युचे तीन रूग्ण असल्याचे संबंधीत अधिकारी यांना सांगितले तरी कुणीही आले नाही. जी औषध फवारणी होते ती बरोबर नाही आणि दैनंदिन फवारणी केल्या जात नाही.

श्रीमती प्राजक्त राजूपत:प्रत्येक वार्डात रेग्यूलर फवारणी व्हावी व औषधे टाकावीत.

श्री.त्रिंबक तुपे :डेंग्युची साथ पसरली होती. डेग्युचे अनेक रूग्ण दवाखान्यात आढळून आले.साफसफाई वेळेवर होणे आवश्यक आहे. कचरा उचलला पाहिजे.तो उचलल्यानंतर त्या जागेवर जंतुनाशक पावडर टाकले जात नाही. विचारणा केली तर नसल्याचे समजते सिडको हडकोत एजन्सीच्या मार्फत होणारी साफसफाई वेळेवर होत नाही.पावसाळयात ते कर्मचारी १०-१५ दिवस महिण्यातून साफसफाई करतांना दिसतात यावर नियत्रंण असणे गरजेचे आहे.घाटीतील डॉक्टारांना डेग्यु होतो ही परीस्थिती असेल तर ही गंभीर बाब असून साफसफाई, औषध फवारणी बाबत वर्षभराचे नियोजन करावे.

श्रीमती कमल नरोटे :माझ्या वार्डात साफसफाई होत नाही ड्रेनेजचे पाणी नाल्यात येते माहिती देवूनही कार्यवाही होत नाही.२-३ रूग्ण आजही ॲडमीट आहे. त्यामुळे नागरीक त्रस्त आहेत.

मा.महापौर :प्रत्येक वार्डात डेंग्यू व इतर आजाराने पीडीत असलेले २-३ रूग्ण आहे. असे असतांना साफसफाई करून कचरा उचलणे, तसेच प्रत्येक वॉर्डनिहाय धूर फवारणी प्रत्येक परीसरात का होत नाही? या बाबतची

जबाबदारी संबंधीत वॉर्ड अधिकारी व घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख यांच्यावर टाकावे.

श्री.गिरजाराम हळनोर :औषध फवारणी व साफसफाई करीता प्रत्येक वार्डनिहाय नियोजन करून त्या संबधी तसे त्या त्या वार्डाचे स.सदस्यांना कळविणे येईल असे ठरले होते. ती कार्यवाही का केली नाही.

मा.आयुक्त :डेग्युच्या बाबतीत माहिती जाणुन घेणे आवश्यक आहे.मलेरिया किंवा डासापासून जे आजार होतात. त्याचा डेग्युंशी तुलना केली जाते तसा प्रकार हा नाही. शास्त्रीय माहिती घेणे आवश्यक आहे.डेग्युचा डास हा स्वच्छ पाण्यात अंडी घालतो.पिण्याचे पाणी,वापराचे पाणी स्वच्छ असेल असेल ते झाकलेले नसेल व जास्त दिवस साठवून ठेवल्यास हा डास अंडी घालतो.अनेक ठिकाणी बांधकाम होत असेल तेथे मोठया हौदात पाणी साठविले जाते.अनेक लोक पाणी दोन दिवसा आड येते म्हणून साठवून ठेवतात त्यासाठी आठवडयातून एक दिवस कोरडा दिन पाळला पाहिजे.यासाठी फवारणी करणारे कर्मचारी आल्यास नागरीकांनी दरवाजा खिडक्या उडल्या कराव्यात. धूर आतमध्ये गेल्यानंतर दरवाजे खिडक्या बंद करणे योग्य होईल, परंतु अनेक नागरीक फवारणी होण्या अगोदरच दरवाजे खिडक्या बंद करून घेतात. त्यामूळे धूर घरामध्ये जात नाही व डासाचे प्रमाण कमी न होता वाढत जाते.त्यासाठी नागरीकामध्ये प्रबोधन होणे आवश्यक आहे.

श्री.त्रिंबक तुपे :फॉगींग व धूर फवारणी मशीन किती आहे.

श्रीमती प्रिती तोतला :फॉगींग मशीन १०-१५ मिनिटापेक्षा जास्त वेळ चालू नसते.नागरीकांना माहित नसते तोपर्यत निघून जातात.

मा.आयुक्त :मनपाचे हॅण्ड पंप मशीन ८० ठेकेदाराचे २४ असे एकूण १०४ आहेत फॉगींग मशीन ३० ठेकेदाराचे १२ एकूण ४२. तसेच ०२ व्हिकल फॉगींग ०३ फिरते फॉगींग मशीन असे एकूण ११२ यंत्र आहेत. आहेत फिरते फवारणी यंत्र एकूण ११२ आहेत.जेंव्हा फवारणीसाठी कर्मचारी वार्डात जातात. त्यांनी युनीफॉर्म घातला पाहिजे. त्याबाबतीत सक्ती केली जाईल. कचरा उचलल्यानंतर जे जंतुनाशक पावडर टाकत होतो. त्यास शासनानी बंदी आणली आहे.जे की त्यामुळे प्रदुषण वाढते असे मंडळाने म्हटले आहे.कायदयाचे पालन सुध्दा करावे लागते.

श्री.नासेर खान :माझ्या वॉर्डात ४ दिवसा आड पाणी येते. कोरडा दिन पाळला तर पाणी देण्याची काय व्यवस्था आहे.१०४ लोकांची फवारणीसाठी टीम आहेत तर शहरात सुरळीत फवारणी का होत नाही?

श्री.गिरजाम हळनोर :स्वच्छते बाबत शहरात मोहिम राबविली जात आहे. अनेक नागरीक यात सहभागी आहे. महापालिकेचे कर्मचारी सुध्दा सहभागी व्हावे तशा सुचना कराव्यात.

मा.आयुक्त :सर्व सदस्यांना विनंती आपआपल्या वार्डात स्वच्छता अभियात राबविण्या बाबत आयोजन करावे. तेथे मनपाचे कर्मचारी सहभागी होतील.प्रशासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंन्टर येथे स्वच्छता

मोहिम राबवली. त्यात विदयार्थी व डॉक्टर हजर होते. नुसते साफसफाई न होता जमा झालेला कचरा उचलून कचरा कुंडीत टाकला पाहिजे.अनेक नागरीक दुभाजकावर,रस्त्यावर कचरा टाकतात १०० टक्के कचरा उचलला पाहिजे. यासाठी नागरीकांमध्ये प्रबोधन होण्याची गरज आहे.टीम तयार करून स्वच्छता अभियानचा कार्यक्रम घेतला जाईल.

श्री.मुजीब खान :वार्ड ४२ मध्ये औषध फवारणी साफसफाई होत नाही. कचरा उचलला जात नाही. येथे कोणते कर्मचारी आहे. पत्र दिले. माहिती दिली नाही.सफाई कर्मचारी कमी असेल म्हणून काही भाग खाजगी एजन्सीला साफसफाईसाठी दिला असे असतांना मनपाचे आस्थापनेवरील कर्मचारी कुठे आहे.जे कर्मचारी वार्डात साफसफाईसाठी पाठविले ते तेथे हजर नाही अधिकारी यांचे घरी काम करतात.

श्रीमती सावित्रीबाई वाणी:माझ्या वार्डात दोन लोकांना डेंग्यु झाला. कचरा उचलला जात नाही. तसेच कत्तलखाना रस्ताचे काम अर्धवट केले तो रस्ता पुर्ण का होत नाही.

मा.महापौर :या बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :डेंग्यु व इतर आजार होवू नये, यासाठी वापराचे पाण्यात टाकण्यासाठी आरोग्य केंद्रात औषध मिळते ते टाकावे.

सौ.साधणा सुरडकर :विकास कामे व्हावी. अशी सर्वांची इच्छा आहे. परंतु कर भरण्यासाठी वार्डात नागरीक जातात. त्यांना २-२ तास उभे रहावे लागते.त्याउपर ही ऑनलाईन झालेले नाही. ४-६ दिवसानी यावे त्यावेळी पावती दिली जाईल असे सांगण्यात येते.ही सिस्टम अपडेट करावी. लगेच पावती मिळेल अशी व्यवस्था करावी. अनेक नवीन वसाहती झालेल्या आहेत.कर भरून घेणे ही आपली गरज आहे.

मा.आयुक्त :कर भरणा करून घेतल्यानंतर लगेच पावती मिळेल अशी व्यवस्था केली जाईल.

श्री.त्रिंबक तुपे :होर्डीग्ज बाबत तात्काळ कार्यवाही करावी उत्पन्नाचा विषय आहे तसेच महापालिकेचे अनेक शॉपींग सेंन्टर आहे सांस्कृतिक ,सामाजिक हॉल हे रिकामे पडलेले आहे ते भाडेने देणे बाबत कार्यवाही करावी.तसेच नवीन वसाहती झालेल्या आहेत तेथील घराला टॅक्स लावावा. नियमाप्रमाणे कर्मचाऱ्यांना टॅक्स लावण्याबाबत सर्व्हे करण्यास पाबंद करावे.

मा.आयुक्त :बांधकाम परवानगी दिली जाते. त्यानंतर भोगवटा प्रमाणपत्रासाठी येत नाही.त्या करदाता यांना सुध्दा काळजी पाहिजे. त्यांना प्रबोधन करण्याची गरज आहे.स्पेशल पथक नेमून अशा मालमत्ताची माहिती घेवून कार्यवाही केली जाईल.यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षीत आहे.बजेट मध्ये १२० कोटी घर पट्टी दाखवली परंतु ४० टक्के सुध्दा वसुली नाही. शासनाचे अनुदान प्राप्तीसाठी ९० टक्के घरपट्टी वसुल झाली पाहिजे तरच विविध योजनाचे अनुदान येते.

श्री.पंकज भारसाखळे :एक वर्षापासून वार्ड ई मध्ये गुंठेवारी विभागात पैसे भरणा करून घेणेसाठी कर्मचारीच नाही.

मा.आयुक्त :ठिक आहे. त्या ठिकाणी कर्मचारी नियुक्त केले जातील.

श्री.मीर हिदायत अली :महापालिकेच्या शाळेवर एकूण ४९९ शिक्षक कार्यरत असून त्यांचे भरवशावर शिक्षण विभाग चालतो. या शिक्षकाची वेतनवाढ थांबविली.८५ टक्के पर्यत शाळेचा निकाल आला.शिक्षकांनी मेहनत घेतली असे असतांना वेतनवाढ थांबविणे योग्य वाटत नाही.नियमानुसार एकदम एवढया संख्येने वेतनवाढ थांबविता येते का?

मा.आयुक्त :या विषयी माहिती घेवून कार्यवाही केली जाईल. रस्त्याची कामे सुरू आहे व्हाईट-टॅपींगच्या रस्तेची कामे सुध्दा सुरू होतील.

श्री.मीर हिदायत अली :रोषण गेट ते आझादचौक राममंदीर रस्त्याचे काम ३ वर्षापासून सुरू आहे. पुर्ण झाले नाही.या रस्त्याकरीता काही मिळकती बांधीत असून वादग्रस्त आहे. त्यांना चर्चेसाठी बोलवून निपटारा करून रस्त्याचे काम पुर्ण करावे.

मा.महापौर :स.सदस्यांनी ज्या सुचना केल्या. त्यांची प्रशासनाने नोंद घेवून कार्यवाही करावी.

श्री.गजानन बारवाल :विषय पत्रिकेला सुरूवात करावी.

**<u>विषय क्रमांक ६४२:-</u>**

सोमवार दिनांक ११.०८.२०१४ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३० विषय क्रमांक ५६९ पासुन ते ६४१), शनिवार दिनांक २०.०९.२०१४ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक ३१) तसेच गुरूवार दिनांक १६.१०.२०१४ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक ३२) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**<u>संवाद :-</u>**

श्री.मुजीब खान :दिनांक ११-८-२०१४ चे इतिवृत्त कायम करतांना विषय क्र.५६१ हा नगरसचिव पदावर श्री.खोब्रागडे यांची नियुक्ती देण्याचा ठराव कायम करण्यासाठी आहे.सभागृहात हे झाले नाही नंतर टाकले गेले.तत्कालीन नगरसचिव एम.ए पठाण हे प्रतिनियुक्तीने गेले. ते २-४ दिवसात पुन्हा नगरसचिव पदावर कार्यरत होणार आहे ते निवृत्त झालेले नाही.असे असताना आताच असा ठराव घेण्याची गरज नाही.हा प्रस्ताव स्थगित करावा.

श्री.मीर हिदायत अली :श्री.एम ए पठाण हे नगरसचिव पदावर कार्यरत होत आहे.त्यांना हज कमेटी विभागाकडून कार्यमुक्त केले आहे.हा विषय स्थगित ठेवावा.

श्री.गजानन बारवाल :श्री.पठाण हे सहा महिण्यानंतर सेवानिवृत्त होणार आहे. त्यानंतर नगर सचिव म्हणुन श्री.खोब्रागडे यांना या पदावर नियुक्ती द्यावी. असा ठरावाची अंमलबजावणी करता येईल.स.सदस्य श्री.मुजीब खान यांनी जी सुचना मांडली.त्यानुसार दुरूस्ती करावी.

श्री.मुजीब खान :सहा महिण्यानंतर श्री.एम.ए पठाण सेवानिवृत्त होणार आहे त्यानंतर नवीन सचिव कार्यरत साठी असा प्रस्ताव यावा.सद्या स्थगित करावे.

श्री.गिरजाराम हळनोर:स.सदस्य श्री. बारवाल यांनी जी सुचना मांडली त्याप्रमाणे श्री.खोब्रागडे यांना या पदावर नियुक्ती द्यावी. ही दुरूस्ती करून इतिवृत्तांत कायम करावे.

श्री.गजानन बारवाल :इतिवृत्त दुरूस्तीसह मंजूर करावे.

मा.महापौर :दिनांक ११-८-२०१४ मधील विषय क्र.६४२ मधील इतिवृत्त कायम करण्याच्या प्रस्तावात विषय क्र. ५६९ प्रस्तावाचा ठराव स्थगित करण्यात येतो.

**ठराव :-**

इतिवृत्तांत कायम करतांना सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दिनांक ११-८-२०१४ रोजीच्या इतिवृत्तांतील पान क्र.११,१२ वर (दि.१०-७-२०१४ रोजीच्या सभेतील स्थगित विषय) विषय क्र.५६९ मध्ये नगरसचिव पदावर श्री. पी. के खोब्रागडे यांची नेमणुक करण्या संदर्भात असलेला ठरावास स्थगिती देण्यात येते. यासह दिनांक ११.०८.२०१४ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३० विषय क्रमांक ५६९ पासुन ते ६४१), शनिवार दिनांक २०.०९.२०१४ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक ३१) तसेच गुरूवार दिनांक १६.१०.२०१४ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक ३२) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभांचे इतिवृत्तांत कायम करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६४३:-** **(मालमत्ता अधिकारी)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महापालिका क्षेत्रात विविध प्रकारचे व्यवसाय, उद्योगधंदे चालू असुन या आस्थापनांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१३,३७६,३७७,३७८ व ३८६ प्रमाणे महानगरपालिकेचा व्यवसाय परवाना घेणे बंधनकारक आहे. तसेच अशा आस्थापना धारकांकडून परवाना शुल्क वसुल करणे अत्यावश्यक आहे.

तरी याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७८ अन्वये महानगरपालिका हद्दीत व्यवसाय करणाऱ्या आस्थापनांना व्यवसाय सुरु करुन व्यवसाय चालू ठेवण्यासाठी परवाना पध्दत सुरु करण्यास मान्यतेसाठी सादर. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३८६ (२) अन्वये महानगरपालिकेच्या मान्यतेने परवाना शुल्क/फी निर्धारीत करण्याची तरतुद आहे. तरी परवाना शुल्क/फी निर्धारीत करणेबाबत सभेला निर्णय घेता येईल.

याबाबत औरंगाबाद महानगरपालिकेने खालील प्रमाणे आस्थापनाचे क्षेत्र पातळीवर परवाना शुल्क आकारणी करता येईल. शासनातर्फे विविध क्षेत्रासाठी सिटी सर्व्हे नंबर नुसार व उर्वरीत मिळकतीकरीता प्रत्येक वर्षी वर्गवारी निश्चित करुन जागेचे प्रति चौ.मी. करीता सिध्द शीघ्र गणकानुसार दर निश्चित करण्यात येतात. त्या आधारे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रकारच्या व्यावसायीक वापरासाठी आस्थापनाचे त्याचे क्षेत्रफळानुसार सर्व प्रकारच्या बांधकामासाठी सर्व समान एकच सिध्द शीघ्र गणक दरानुसार १ टक्का (एक टक्का) दर नवीन

परवाना शुल्क आकारणी महानगरपालिकेच्या अटीशर्तीनुसार एक वर्ष कालावधीकरीता प्रस्तावित करण्यात येत असून त्यानंतर प्रत्येक वर्षी नुतनीकरण करतांना शासनाचे त्या वर्षाच्या सिध्द शीघ्र गणक दरानुसार ०.२ टक्के (शुन्य दशांश दोन टक्के) परवाना शुल्क आकारणी कर प्रस्तावित करण्यात येत आहे. संबंधीताने प्रत्येक वर्षी कालावधी संपण्याच्या एक महिना अगोदर नुतनीकरण करण्यासाठी अर्ज सादर करुन नवीन वर्षाच्या जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहील. असे न केल्यास विलंब शुल्क म्हणून एकूण आकारण्यात आलेल्या परवाना शुल्क फी च्या १० टक्के (दहा टक्के) विलंब शुल्क प्रतिवर्ष आकारण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडणार आहे.

करीता वरील प्रमाणे परवाना शुल्क निर्धारीत करणेसाठी व प्रकरणी नियम व अटी निश्चित करुन कार्यवाही करणेसाठी आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना अधिकार प्रदान करणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :हा विषय रद्द करण्यात येतो.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यास मंजुरी देण्यात आली.

**<u>विषय क्रमांक ६४४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वॉर्डात डांबरीकरण करण्याकरीता रक्कम रुपये २०,०० लक्ष ठेवण्यात आले होते. वॉर्ड क्र ७१ हुसैन कॉलनी येथील विविध गल्ल्यांमध्ये कॉंक्रेट रस्ता दुरूस्त करणे बाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**सुचक :-** श्रीमती पुष्पा कांतीलाल निरपगारे

**अनुमोदक :-** श्रीमती साधना सुरडकर, श्रीमती ज्योती खिल्लारे

मा.महापौर :- विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे या वॉर्डात डांबरीकरण करण्याकरीता रक्कम रुपये २०,०० लक्ष ठेवण्यात आले त्याऐवजी वॉर्ड क्र ७१ हुसैन कॉलनी येथील विविध गल्ल्यांमध्ये कॉंक्रेट रस्ता दुरूस्त करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ६४५:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प सन २०१४-१५ मधील मा.स्थायी समिती व मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली नवीन कामांमधील खालील कामांचे लेखाशिर्ष बदलण्यात यावे.

| अ क्र | जुने कामाचे नाव व तरतुद | नवीन प्रस्तावित काम |
|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र ६७ अंतर्गत विविध ठिकाणी पुर्नःडांबरीकरण करणे रु. १०.०० लक्ष GBR F 12 Sr.no. 3 | वॉर्ड क्र ६७ नाथ नगर येथील नाल्यावरील पुल ते सायली हॉटेल ते त्रिमुर्ती चौक ते सुंदर हॉटेल पर्यंत रस्त्यालगत फुटपाथ बनविणे रु. १३ लक्ष |
| ०२ | वॉर्ड क्र ६७ अंतर्गत रस्ते देखभाल दुरूस्ती पॅचवर्क पुर्नःडांबरीकरण करणे रु. १५.०० | वॉर्ड क्र ६७ अंतर्गत त्रिमुर्ती चौकाचे सुशोभिकरण करणे रू. ५.०० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| | लक्ष SCR F 18 Sr.no. 3 | |
| ०३ | | वॉर्ड क्र ६७ नाथ नगर हनुमान मंदिर ते बालाजी नगर मुख्य रस्त्यापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीट करणे रू. ७.०० लक्ष |

**सुचक :-** श्रीमती शोभा पुखराज काळे **अनुमोदक :-** श्रीमती ज्योती रमेश खिल्लारे
मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अर्थसंकल्प सन २०१४-१५ मधील मा.स्थायी समिती व मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली रक्कम नवीन कामांकरीता खालील लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ क्र | जुने कामाचे नाव व तरतुद | नवीन प्रस्तावित काम |
|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र ६७ अंतर्गत विविध ठिकाणी पुर्न:डांबरीकरण करणे रु. १०.०० लक्ष GBR F 12 Sr.no. 3 | वॉर्ड क्र ६७ नाथ नगर येथील नाल्यावरील पुल ते सायली हॉटेल ते त्रिमुर्ती चौक ते सुंदर हॉटेल पर्यंत रस्त्यालगत फुटपाथ बनविणे रु. १३ लक्ष |
| ०२ | वॉर्ड क्र ६७ अंतर्गत रस्ते देखभाल दुरूस्ती पॅचवर्क पुर्न:डांबरीकरण करणे रु. १५.०० लक्ष SCR F 18 Sr.no. 3 | वॉर्ड क्र ६७ अंतर्गत त्रिमुर्ती चौकाचे सुशोभिकरण करणे रू. ५.०० लक्ष |
| ०३ | | वॉर्ड क्र ६७ नाथ नगर हनुमान मंदिर ते बालाजी नगर मुख्य रस्त्यापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीट करणे रू. ७.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६४६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र २० आंबेडकर नगर येथे मुख्य ड्रेनेज लाईनचे चोकअप काढण्यासाठी उप अभियंता (वॉर्ड ब) कार्यकारी अभियंता यांनी तोंडी आदेश देऊन काम करण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे १५ दिवसापासून चेंबर मधील गाळ काढणेचे काम चालु होते. पण दिनांक ०६.०९.२०१४ रोजी चोकअप चे काम करीत असतांना रतन यशवंत आवचार यांचा दुर्दैवी अंत झाला आहे. त्यांच्या कुटूंबीयांना किमान रक्कम रुपये १०.०० लक्षची आर्थीक मदत करण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात यावा.

**सुचक :-** श्री. मनिष चंद्रकांत पा.दहिहंडे, श्री. विजय वाघचौरे, श्री. राजु शिंदे,
श्रीमती संगिता राजू अहिरे

**अनुमोदक :-** श्री. रावसाहेब गायकवाड, श्री. कृष्णाभाऊ बनकर, डॉ. खान जफर अहेमद,
श्री. काशीनाथ कोकाटे.

मा.महापौर :नियमानुसार आर्थिक मदत देण्यात यावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र २० आंबेडकर नगर येथे मुख्य ड्रेनेज लाईनचे चोकअपचे काम करीत असतांना दिनांक ०६.०९.२०१४ रोजी रतन यशवंत आवचार यांचा दुर्दैवी अंत झाल्याने त्यांच्या कुटूंबीयांना नियमानुसार आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ६४७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र ५ पहाडसिंगपुरा असेफिया कॉलनी, बेगमपुरा हा वॉर्ड लोकसंख्येने खुप मोठा असून या ठिकाणी मनपाचे आरोग्य केंद्र नाही. सदरील वॉर्डाचे आरोग्य केंद्र हे नंदनवन कॉलनी येथे असून ते जवळपास ४ ते ५ किलोमीटर दुर आहे. येथील गोरगरीब नागरीकांना त्याचा काहीच उपयोग होत नाही. या वॉर्डात जवळपास ८ ते ९ हजार लोकसंख्या आहे.

करीता या ठिकाणी आरोग्य केंद्राची खुप आवश्यकता आहे. करीता या परिसरात आरोग्य केंद्र उभारण्यात यावे. जेणे करून या भागातील लोकांना आरोग्याची सुविधा उपलब्ध होईल. करीता सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**सुचक :-** श्रीमती पुष्पा देविदास सलामपुरे

**अनुमोदक :-** श्री. किशोर नागरे, श्री. मनिष चंद्रकांत पा.दहिहंडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र ५ पहाडसिंगपुरा असेफिया कॉलनी, बेगमपुरा भागात मनपाचे आरोग्य केंद्र नसल्याने या परिसरात आरोग्य केंद्र उभारण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ६४८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कु. साक्षी दिनेश चितलांगे हिने नुकत्याच सिंगापुर येथे झालेल्या जागतिक हौशी महिला बुध्दीबळ स्पर्धेत भारताचे प्रतिनीधीत्व केले असून या स्पर्धेत विजेते पद पटकावून ऐतिहासीक कामगीरी केली आहे. हि कामगिरी करणारी कु.साक्षी दुसरी भारतीय ठरली असून या कामगिरी मुळे सिंगापुरचे परराष्ट्रीय व्यवहार व कायदेमंत्री श्री.के.शानमुगम यांच्या हस्ते तिला ट्रॉफी,पदक व रोख रक्कम १००० युरो (८५,०००/- भारतीय रुपये) बक्षीस देण्यात आले आहे. कु.साक्षी बुध्दीबळ या खेळात जगज्जेती बनल्याबद्दल १० जुन २०१४ रोजी जागतिक बुध्दीबळ संघटना फिडेचे अध्यक्ष श्री.कर्सेन (रशिया) यांच्या हस्ते अधिकृत रित्या **वुमन फिडे मास्टर** (डब्ल्यु.एफ.एम.) हा किताब देण्यात आला. हा किताब भारताला तब्बल सहा वर्षानंतर बहाल झाला आहे. हा किताब केवळ जगात प्रथम येणाऱ्या खेळाडुनांच दिला जातो. यापुर्वी कु.साक्षी हिने महाराष्ट्राच्या संघातून खेळत मुलींच्या १४ वर्षाखालील राष्ट्रीय शालेय बुध्दीबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत स्वर्णपदक तर १७ वर्षाखालील राष्ट्रीय शालेय बुध्दीबळ स्पर्धेत रौप्यपदक मिळविले आहे. या स्पर्धेतील कु. साक्षीची कामगिरी पाहता तिने भारताचेच नाव जगात उंचावलेले नसुन औरंगाबादचे ही नाव जगात उंचविले आहे. जशी औरंगाबादची औद्योगिक प्रगती झपाट्याने होत आहे तशीच प्रगती खेळातही होत आहे हे साक्षीने जागतिक विजेतेपद पटकावून सिध्द केले आहे .या कामगिरीबद्दल कु.साक्षीचे सर्व स्तरातून कौतूक होत आहे.

तरी महानगरपालिका औरंगाबाद तर्फे मानधन व स्मृतिचिन्ह देऊन सभागृहात तिचा सत्कार करावा.

तरी सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेस मान्यतेस्तव सादर.

**सुचक :-** श्री. मधुकर सावंत, श्री. प्रफुल्ल मालानी, श्री. अनिल मकरिये, श्री. समीर राजुरकर, श्री.सुरेंद्र कुलकर्णी.

**अनुमोदक :-** श्री. बाळासाहेब दि.मुंडे, श्री.बबन नरवडे, श्री. अशोक बेहडे,
श्री. खान अक्रम करीम खान, श्री. जुबेर गाझी असीर अहमद, श्री. शेख खाजा शेख शरीफोद्दीन

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कु. साक्षी दिनेश चितलांगे हिने नुकत्याच सिंगापुर येथे झालेल्या जागतिक हौशी महिला बुध्दीबळ स्पर्धेत भारताचे प्रतिनीधीत्व केले असून या स्पर्धेत विजेते पद पटकावून ऐतिहासीक कामगीरी केल्याने महानगरपालिका औरंगाबाद तर्फे मानधन व स्मृतिचिन्ह देऊन सभागृहात तिचा सत्कार करण्याकरीता प्रशासनान योग्य ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६४९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सध्या औरंगाबाद शहरात मालमत्ता कर वसुली करण्यात येत आहे. या मालमत्ता कर वसुलीत विलंब आकार म्हणून थकबाकीवर वसुल करण्यात येते, जेंव्हा या बाबत मा.आयुक्तांशी चर्चा झाली असता मा.आयुक्त साहेबांनी विलंब आकार “ पेनाल्टी ” वसूल करु नये, म्हणून तोंडी आदेश दिलेले आहे.

परंतू कर वसूल करतांना विलंब आकार वसुल करण्यात येतो ज्यामुळे शहरातील नागरीकांवर जास्तीचा आर्थिक बोजा पडत असल्यामुळे वसुलीवर परिणाम होत आहे.

म्हणून फक्त विलंब आकारासाठी मालमत्ता व इतर कर भरण्यास टाळाटाळ करत आहे.

तरी शहरात मालमत्ता कर वसुलीत विलंब आकार वसुल न करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.जहाँगीर खान अब्बास खान **अनुमोदक:-**श्री.मिर हिदायत अली मीर बसालत अली.

मा.महापौर :यापुर्वी याबाबतीत ठराव झालेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत यापुर्वी झालेल्या ठरावानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्रमांक ६५०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.राजेंद्र रविंद्र बागुल रा.एन-५ सत्यमनगर, सिडको, औरंगाबाद. हे शहरातील होतकरु राष्ट्रीय नेमबाज असुन त्यांनी राष्ट्रीय स्तरावर एक रौप्य पदक व एक कांस्य पदक व नॉर्थ झोन दिल्ली येथे झालेल्या स्पर्धेत प्रथक क्रमांक मिळवला आहे. तसेच राष्ट्रीय, विभागीय व राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धेत चांगली क्रमवारी प्राप्त केलेली आहे.

सदर खेळाडुस आपल्या उज्वल भवितव्यासाठी एक एअर पिस्टल, एक २२ फ्री पिस्टल, १० हजार काडतुसे, शुटींग ग्लासेस, शुटींग शुज व इतर साहित्य खरेदी करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी संबंधितांस आर्थिक मदतीची गरज आहे.

शहरातील या राष्ट्रीय स्तरावरील नेमबाजास आर्थिक मदत केल्यास तो नेमबाजीत उत्तम कामगीरी करेल व त्यामुळे औरंगाबाद शहराचे नावलौकीक वाढविण्यास मदत होईल करिता मनपा तर्फे संबधितांस आर्थिक मदत करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती रेखा अजित जैस्वाल, श्री.मिलींद दाभाडे.

**अनुमोदक:-** श्रीमती रेणुका वाडेकर, श्री.रावसाहेब गायकवाड, श्रीमती ज्योती रुपचंद वाघमारे, श्री.मिर हिदायत अली, श्री.कैलास गायकवाड, श्री.शेख हबीब शेख छोटु कुरैशी.

मा.महापौर :नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.राजेंद्र रविंद्र बागुल रा.एन-५ सत्यमनगर, सिडको, औरंगाबाद हे शहरातील होतकरु राष्ट्रीय तसेच विभागीय व राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धेत चांगली क्रमवारी प्राप्त केल्याने सदर खेळाडुस यासाठी आवश्यक साहित्य घेण्यासाठी मनपा तर्फे संबधितांस नियमानुसार आर्थिक मदत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६५१ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,

१. वार्ड क्र.७३ मधील प्रबोधनकार ठाकरे नगर बी सेक्टर येथील खुले रंगमंचास लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे नांव देणे.
२. वार्ड क्र.७३ प्रबोधनकार ठाकरे नगर मधील डी सेक्टर येथील रंगमंचास विनय गणेश असे नांव देणे.
३. वार्ड क्र.७३ छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा मैदानावरील खुले रंग मंचास राजश्री छत्रपती शाहु महाराज भोसले नांव देण्यांत यावे.
४. वार्ड क्र.७३ प्रबोधनकार ठाकरे नगर सी सेक्टर येथील मनपाचे खुले रंगमंचास ह.भ.प.ब्रम्हलीन गुरु विष्णु महाराज माउली आपेगांवकर असे नांव देण्यात यावे.
५. वार्ड क्र. ७३ संत तुकोबा नगर सर्वे नं. ७० येथील मनपाच्या सभागृहास स्व.मानकचंद झांबड नांव देण्यांत यावे.

वरील सर्व प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेमध्ये सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सत्यभामा दामोधर शिंदे

**अनुमोदक:-** श्रीमती फिरदोस फातेमा रमजानी खान, श्रीमती निलाबाई देविदास जगताप

मा.महापौर :नामांतर समितीकडे पाठविण्यात यावे.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्ताव नामांतर समितीकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६५२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कामगार चौक ते महालक्ष्मी चौकच्या मुख्य डि.पी. रस्त्याचे डांबरीकरणासाठी सन २०१३-२०१४ मध्ये आर्थिक तरतुद ५० लक्ष होती. त्या रस्त्याचे अंदाज पत्रक सुध्दा मंजुर आहे. पण सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पातून ५० लक्ष तरतुद वगळल्या गेल्यामुळे सदरील कामासाठी निधी नसल्यामुळे सदरील काम होत नाही. स्थायी समितीने वार्ड क्र.७३ साठी सन २०१४ ते २०१५ SCR-E-16 अनु.क्र.०४ मध्ये रुपये ८० लाख

विविध विकास कामासाठी ठेवलेल्या मधुन ५० लाख कामगार चौक ते महालक्ष्मी चौक हा मुख्य रस्ता तयार करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-** श्रीमती सत्यभामा दामोधर शिंदे **अनुमोदकः-** श्रीमती निलाबाई देविदास जगताप
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कामगार चौक ते महालक्ष्मी चौकच्या मुख्य डि.पी. रस्त्याचे डांबरीकरणासाठी सन २०१३-२०१४ मध्ये आर्थिक तरतुद ५० लक्ष होती. त्या रस्त्याचे अंदाज पत्रक सुध्दा मंजुर असून सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पातून ५० लक्ष तरतुद वगळल्या गेल्यामुळे सदरील कामासाठी निधी नसल्यामुळे सदरील काम होत नाही त्यामुळे स्थायी समितीने वार्ड क्र.७३ साठी सन २०१४ ते २०१५ SCR-E-16 अनु.क्र.०४ मध्ये रुपये ८० लाख विविध विकास कामासाठी ठेवलेल्या ५० लाख मधुन कामगार चौक ते महालक्ष्मी चौक हा मुख्य रस्ता तयार करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६५३ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक २२.०८.२०१४ रोजी शुक्रवारी दुपारी ३.०० वाजेच्या सुमारास गणेश कॉलनी, व्ही आय पी रोड वर महानगरपालिकेचे रुग्णवाहिनी (ॲम्ब्युलंस) या वाहनाने रशिदपुरा येथे हॉटेलात काम करणाऱ्या सय्यद माजेद अली सय्यद फारुख अली या इसमास जोरदार धक्का दिला. वाहनाच्या धक्क्याने सदर इसम हा गंभीर जखमी झाला व त्यास शासकीय रुग्णालयात (घाटी) उपचारासाठी दाखल करण्यात आले.

सदर इसम हा अत्यंत गरिब असुन त्यावर त्यांचे कुटूंब अवलंबुन आहे.

सदर इसमास उपचारासाठी व कुटूंबाचे खर्च करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेकडून २ लाखची आर्थीक मदत देणे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-** श्रीमती जरीना मो.जावेद **अनुमोदकः-** श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
मा.महापौर :प्रशासनाने योग्य ती नियमानुसार आर्थीक मदत करावी.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक २२.०८.२०१४ रोजी शुक्रवारी दुपारी ३.०० वाजेच्या सुमारास गणेश कॉलनी, व्ही आय पी रोड वर सय्यद माजेद अली सय्यद फारुख अली या इसमास महानगरपालिकेचे रुग्णवाहिनी (ॲम्ब्युलंस) या वाहनाच्या धक्क्याने गंभीर जखमी झाल्याने सदर इसमास उपचारासाठी झालेला खर्च त्याच्या कुटूंबीयास नियमाप्रमाणे आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६५४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र ०८ येथील रहिवासीयांच्या सुविधेसाठी मनपा अर्थसंकल्पातील खालील लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. व अ.क्र. | सन २०१४-२०१५ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी लेखाशिर्ष बदलणे |
|---|---|---|
| जी.बी.आर. ए-२ अ.क्र. | १. पडेगाव मौजे मिटमिटा गट क्र. ९०,९६,९४ लगत असलेले | १. वॉर्ड क्र ०८ मधील सिल्लेखाना रस्त्याचे डांबरीकरण करणे. |

| | | |
|---|---|---|
| ०५ | डि.पी. रस्ता मजबुतीकरण करणे.<br>आर्थिक तरतुद ०१ कोटी | या कामासाठी रुपये ५० लक्ष वळती करण्यात यावे.<br>२. वॉर्ड क्र ०८ मधील चिनार गार्डन रस्त्याचे डांबरीकरण करणे.<br>या कामासाठी रुपये ५० लक्ष वळती करण्यात यावे. |

**सुचक :-** श्रीमती सावित्रीबाई हिरालाल वाणी **अनुमोदक :-** श्री. प्रफुल्ल मालानी

मा.महापौर :विषय मंजुर. नियमाप्रमाणे काम करण्याची कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र ०८ येथील रहिवासीयांच्या सुविधेसाठी खालील लेखाशिर्ष बदलण्यास व नियमानुसार काम करण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र. व अ.क्र. | सन २०१४-२०१५ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी लेखाशिर्ष बदलणे |
|---|---|---|
| जी.बी.आर. ए-२ अ.क्र. ०५ | १. पडेगाव मौजे मिटमिटा गट क्र. ९०,९६,९४ लगत असलेले डि.पी. रस्ता मजबुतीकरण करणे.<br>आर्थिक तरतुद ०१ कोटी | १. वॉर्ड क्र ०८ मधील सिल्लेखाना रस्त्याचे डांबरीकरण करणे.<br>या कामासाठी रुपये ५० लक्ष वळती करण्यात यावे.<br>२. वॉर्ड क्र ०८ मधील चिनार गार्डन रस्त्याचे डांबरीकरण करणे.<br>या कामासाठी रुपये ५० लक्ष वळती करण्यात यावे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक ६५५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जी.टी.एल कंपनीतर्फे महनगरपालिकेमार्फत आकारण्यात येणाऱ्या स्थानिक संस्था कर (एल.बी.टी) ची वसुली नागरिकांकडून करण्यात येत आहे. ही वसुली ग्राहकांना कसलीही पूर्वसुचना न देता वसुल करण्यात येत असल्यामुळे व स्थानिक संस्था कराची रक्कम जी.टी.एल. कंपनीला देय असल्यामुळे नागरिकांकडून वसुल करणे योग्य नाही.

करीता महापालिकेमार्फत जी.टी.एल. कंपनीला आकारण्यात येणारा स्थानिक संस्था कर हा कंपनीने नागरिकांकडून वसुल न करता स्वत: भरावा.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.किशोर नागरे **अनुमोदक:-** श्री.प्रफुल्ल मालानी.

**संवाद :-**

श्री.गजानन बारवाल :जी.टी एल कंपनीला लावलेला स्थानिक संस्था कर (एलबीटी) हा जी.टी.एल.कंपनीने महापालिकेला भरावा याचा बोजा त्यांनी नागरीकांवर टाकू नये.

श्री.किशोर नागरे :एलबीटी जीटीएल कंपनीने स्वत:महापालिकेला भरावा. ही रक्कम जीटीएल कंपनीने नागरीकांकडून वसुल करू नये.

मा.उपमहापौर :एलबीटी लावण्याचा निर्णय शासनाकडून आलेला आहे. दुर्देवाचे जीटीएल कंपनी या शहरात आली. या कंपनीने समाज उपयोगी,हितोपयोगी एकही काम केले नाही. शहरातील रस्ते मोठे केले त्या रस्त्यामधील पोल सुध्दा कंपनीने अद्यापही काढले नाही. त्यामूळे कंपनीला एलबीटी माफ करण्याचा विषयच येत नाही. वृत्तपत्रात काही बातम्या वाचल्या की कंपनी येथून सोडून जाणार, या संदर्भात शासनाला कळवावे की कंपनी व शासन स्तरावर जो निर्णय होईल त्यावेळी कंपनीकडून शासनाने महापालिकेचे जे २२-२५ कोटी रूपये आहे वर्ग करून महापालिकेला दयावे.

श्री.गिरजाराम हळनोर:मा.आयुक्तांनी जीटीएल संबधीत अधिकारी असतील त्यांचेशी चर्चा करावी व एलबीटी कर हा जीटीएल किंवा जी विद्युत पुरवठा कंपनी असेल त्यांचेकडून वसुल करण्यात यावा आणि नागरीकांवर याचा बोजा पडू नये.

श्री.प्रफुल्ल मालाणी :दि.१-४-२०१२ पासून एलबीटी लागू झाला. म्हणजेच शासनाची मान्यता मिळाली. नंतर ती मान्यता उठवली म्हणजे १७ महिण्याचा हा प्रश्न आहे, एलबीटी कायदया प्रमाणे जेंव्हा कंपनीला मनपाने एलबीटी लागू केला तेंव्हा महावितरणाने हा कर ग्राहकाकडून वसुल करण्यास जीटीएलला सांगणे अपेक्षीत होते. तेव्हा जीटीएलने कर लावला नाही. ही नागरीकांची चुक नाही. आता जीटीएल-महावितरणाचे भांडण असेल त्यास महानगरपालिकेचा संबध नाही. आता कंपनी ग्राहकांना एलबीटी लावत असेल तर तो त्यांना अधिकार नाही. उदा. एखादा ब्रीज विकत घेतला. ग्राहकाने बीलाचा भरणा केला व वर्षानंतर तो व्यापारी बील देतांना व्हॅट लावण्याचे विसरलो आता पैसे दया असे म्हटले तर ती मागणी योग्य नाही. जीटीएलने त्याच वेळेस बील आकारण्या बाबते शासनाशी चर्चा करायला पाहिजे होती. महाराष्ट्र शासन व एक असोशिएशन यांचे कोर्ट प्रकरण झाले. असोशिएशनला टॅक्स लावला परंतु त्यांनी कुणालाही टॅक्स लावला नाही. यावर सुप्रिम कोर्टाने असोशिएशनची चुक आहे. आता स्वत:पैसे भरा. असे म्हटले हा सुप्रिम कोर्टाचा निर्णय आहे. त्याप्रमाणे जीटीएलने वेळीच ग्राहकांना एलबीटीचा कर लावला नाही. जीटीएलची चुक आहे. आता महावितरणाकडे ही यंत्रणा गेली तरी कायदयात तशी तरतुद आहे की,जो कुणी ही यंत्रणा चालवायला घेईल त्यांची ती जबाबदारी राहिल. त्यानुसार महावितरण/जीटीएल कुणीही असेल त्यांनी महापालिकेला थकीत एलबीटी भरायला पाहिजे.

श्री.काशिनाथ कोकाटे: जीटीएलने विचार न करता मनमानी करून ग्राहकांना एलबीटी कर लावला. सुरूवातीला आपण म्हटले की लाईटवर एलबीटी लावू. परंतु महावितरण व जीटीएलचा करार झाला. दर वाढवायचे असेल तर त्या

कंपनीचे जे कोर्ट असते त्यांचेशी चर्चा विनिमय होवून कार्यवाही व्हायला पाहिजे होती. आता जो निर्णय सर्वसाधारण सभेचा आहे त्यानुसार मा.आयुक्त व आपण स्वत:हे सांगावे की नागरीकांनी एलबीटी भरण्याची आवश्यकता नाही.

मा.महापौर :स्थानिक संस्था कर (एल.बी.टी.) हा जी.टी.एल. किंवा महावितरण कंपनीनेच भरावा. याचा भार (बोजा) नागरीकांवर टाकू नये. याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहातील चर्चेनुसार जी.टी.एल कंपनीतर्फे महनगरपालिकेमार्फत आकारण्यात येणाऱ्या स्थानिक संस्था कर (एल.बी.टी) ची वसुली नागरिकांकडून (ग्राहकांना) कसलीही पूर्वसुचना न देता वसुल करण्यात येत असल्यामुळे व स्थानिक संस्था कराची रक्कम जी.टी.एल./महावितरण कंपनीला देय असल्याने स्थानिक संस्था कर हा कंपनीने नागरिकांकडून वसुल न करता स्वत: भरण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ६५६:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, म.न.पा. औरंगाबाद संचलित मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र औरंगाबाद हे संशोधन केंद्र महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण भारतात नाव लौकिक आहे. या संशोधन केंद्रात विविध विषयांचे दुर्मिळ पुस्तकांचा खजाना आहे. व मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र औरंगाबाद हे संशोधनासाठी केंद्र बिन्दू आहे.

या संशोधन केंद्रात विद्यार्थी भरपूर फायदा घेत आहेत. तरी या संशोधन केंद्रात एकपण वर्तमान पत्र नाही. (वाचा संदर्भ औरंगाबाद म.न.पा. सर्वसाधारण सभा दि.२४.११.२००५ ठराव क्र.१०४/७, नियमावलीत) या संशोधन केंद्रात वर्तमानपत्रा करिता ठराव पास करण्यात आला.

याच संशोधन केंद्रात संशोधन विद्यार्थ्यांकरिता अल्प दरात झेरॉक्स सुविधा, वर्तमान पत्र व इंटरनेट सुविधा सुरु करण्यात यावी. जेणे करुन संशोधक विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही. (३/४ वर्तमान पत्र सुरु करावे. हि विनंती.)

औरंगाबाद शहरात ऊर्दु भाषेचा वाव आहे. ऊर्दु भाषेचे ज्ञान मुस्लिम समाज व इतर समाज पण ऊर्दु भाषा शिकण्या करिता उत्सुक आहेत. तरी मनपा औरंगाबाद मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रात ऊर्दु भाषेचे वर्ग सुरु करण्यास परवानगी द्यावी. ही ऊर्दु भाषा शिकण्यास वयाची अट नाही. या ऊर्दु वर्ग भाषा करिता प्राध्यापक आपली सेवा **विनामुल्य** देण्याकरिता उत्सुक आहेत, तरी मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र औरंगाबाद येथे ऊर्दु वर्ग सुरु करण्यास परवानगी द्यावी. करिता सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** डॉ.नुजहत तरन्नुम **अनुमोदक:-** श्री.रावसाहेब गायकवाड.

श्री.गजानन बारवाल :प्रस्ताव नमुद असल्यानुसार मंजूरी दयावी.

मा.महापौर :प्रशासनाने ज्या उद्देशाने हे संशोधन केंद्र सुरू केले त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे म.न.पा. औरंगाबाद संचलित मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रात विद्यार्थ्यांकरिता अल्प दरात झेरॉक्स सुविधा, वर्तमान पत्र व इंटरनेट सुविधा

सुरु करणे तसेच ऊर्दु वर्ग भाषा करिता प्राध्यापक आपली सेवा **विनामुल्य** देण्याकरिता उत्सुक असल्याने उर्दु भाषा वर्ग सुरू करण्यास परवानगी देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६५८:- (इतिवृत्तांतात पान क्र. ११ वर विषय क्रमांक ६५७ घेण्यात आलेला आहे.)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आपल्या संसदेत निवडूण आलेल्या सदस्यातून दरवर्षी उत्कृष्ट सांसदपटू हा सन्मान देण्यात येतो, यात लोकसभा व राज्य सभेचे खासदार मधुन निवडले जातात.

यांची निवड संसदिय गठित कमिटी करते. यात कोणताही भेदभाव नसतो. उत्कृष्ट सांसदपटू या सन्मानास काही निष्कर्ष असतात त्यात संसदेत संसदची हजरी, वैयक्तीक शिक्षण, चर्चेत सहभाग, संसदेत वर्तणूक इत्यादी.

तरी या धरतीवर आपल्या म.न.पा. औरंगाबाद मधून एक पुरूष व एक महिला (उत्कृष्ट कॉर्पोरेटर) दरवर्षी निवडले जावेत. त्यांना प्रत्येकी स्मृतिचिन्ह देऊन आपल्या म.न.पा. वर्धापन दिनी गौरवण्यात यावा. यांची निवड एक गठीत कमिटी द्वारा निवडण्यात यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक :-** डॉ.नुजहत तरन्नुम **अनुमोदक :-** श्री. रावसाहेब गायकवाड

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संसदेत निवडूण आलेल्या सदस्यातून दरवर्षी उत्कृष्ट सांसदपटू हा सन्मान त्यांच्या संसदची हजरी, वैयक्तीक शिक्षण, चर्चेत सहभाग, संसदेत वर्तणूक इत्यादीव या धरतीवर दिला जातो. त्याप्रमाणेच म.न.पा. औरंगाबाद मधून एक पुरूष व एक महिला (उत्कृष्ट कॉर्पोरेटर) दरवर्षी निवडुन देण्याकरीता एक गठीत कमिटी नेमुन म.न.पा. वर्धापन दिनी त्यांना गौरवण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६५९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि.११.११.२०१४ च्या सर्वसाधारण सभेत सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात खालील कामे रद्द करुन प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामांसाठी पुरेशी तरतुद उपलब्ध करुन द्यावी व लेखाशिर्ष बदलाचा खालील प्रस्ताव या सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव ठेवण्यात यावा.

| पान नं.व अ.क्र | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| वार्ड-सी, स्पील-६० अ.क्र.११ | सन २०१४-१५ चा अर्थसंकल्पात वार्ड क्र.५५ कैसर कॉलनी अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे.<br>आर्थिक तरतुद ०५.०० लक्ष. | वार्ड क्र.५५ येथे मिनारा मस्जीद समोर हायमास्ट लाईट लावणे बाबत.<br>रु.०५.०० लक्ष. |
| वार्ड-सी, स्पील-५९ अ.क्र.७४ | सन २०१४-१५ चा अर्थसंकल्पात वार्ड क्र.५५ येथे मुबारक मस्जीदजवळ कॉँक्रीट रस्ता तयार करणे.<br>आर्थिक तरतुद ०५.०० लक्ष. | वार्ड क्र.५५ येथे राजु मिसाळ यांचे घरापासून सलीम पटेल यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे बाबत.<br>रु.०५.०० लक्ष. |
| वार्ड-सी, स्पील- | सन २०१४-१५ चा अर्थसंकल्प वार्ड क्र.५५ | वार्ड क्र.५५ येथे विविध |

| | | |
|---|---|---|
| ६७ अ.क्र.०४ | कैसर कॉलनी ग.क्र.१ व २ येथील दुषीत पाणी पुरवठा बंद करणे व उंच भागावरील पाणी पुरवठा सुरळीत करणे.<br>आर्थिक तरतुद ०९.०६ लक्ष. | ठिकाणी कॉंक्रेटीं करणे.<br>रु.०९.०६ लक्ष. |
| वार्ड-सी, स्पील-<br>६७ अ.क्र.०५<br>सन २०१४-२०१५ | सन २०१४-१५ चा अर्थसंकल्पात वार्ड क्र.५५ कैसर कॉलनी रस्सीवाली गल्ली ते फातेमा स्कुल गल्ली व हम्ज़ा मस्जीदच्या मागील गल्लीतील दुषीत पाणी पुरवठा बंद करणे व पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी १०० व १५० मि.मी. जलवाहिनी टाकणे.<br>आर्थिक तरतुद ०८.९४ लक्ष. | वार्ड नं.५५ येथे विविध ठिकाणी ईटालियन पेव्हर ब्लॉक बसविणे.<br>रु.०८.९४ लक्ष. |
| वार्ड-सी, स्पील-<br>६७ अ.क्र.०६<br>सन २०१४-२०१५ | वार्ड क्र.५५ कैसर कॉलनी, चौधरी मंगल कार्यालय, बांबु यांच्या गल्लीतील दुषीत पाणी बंद करण्यासाठी व पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी विविध ठिकाणी १०० व १५० मि.मी. जलवाहिनी टाकणे.<br>आर्थिक तरतुद ०५.७१ लक्ष. | वार्ड नं.५५ येथे विविध ठिकाणी ईटालियन पेव्हर ब्लॉक बसविणे.<br>आर्थिक तरतुद रु. ०५.७१ लक्ष. |

**सुचक:-** श्री.शाहनवाज खान. **अनुमोदक:-** श्री.मनीष चंद्रकांत दहीहंडे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात खालील कामे रद्द करुन खालील कामासाठी लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान नं.व अ.क्र | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| वार्ड-सी, स्पील-६०<br>अ.क्र.११ | सन २०१४-१५ चा अर्थसंकल्पात वार्ड क्र.५५ कैसर कॉलनी अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे.<br>आर्थिक तरतुद ०५.०० लक्ष. | वार्ड क्र.५५ येथे मिनारा मस्जीद समोर हायमास्ट लाईट लावणे बाबत.<br>रु.०५.०० लक्ष. |
| वार्ड-सी, स्पील-५९<br>अ.क्र.७४ | सन २०१४-१५ चा अर्थसंकल्पात वार्ड क्र.५५ येथे मुबारक मस्जीदजवळ कॉंक्रीट रस्ता तयार करणे.<br>आर्थिक तरतुद ०५.०० लक्ष. | वार्ड क्र.५५ येथे राजु मिसाळ यांचे घरापासून सलीम पटेल यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे बाबत.<br>रु.०५.०० लक्ष. |
| वार्ड-सी, स्पील-६७<br>अ.क्र.०४ | सन २०१४-१५ चा अर्थसंकल्प वार्ड क्र.५५ कैसर कॉलनी ग.क्र.१ व २ येथील दुषीत पाणी पुरवठा बंद करणे व उंच भागावरील पाणी पुरवठा सुरळीत करणे.<br>आर्थिक तरतुद ०९.०६ लक्ष. | वार्ड क्र.५५ येथे विविध ठिकाणी कॉंक्रेटीं करणे.<br>रु.०९.०६ लक्ष. |
| वार्ड-सी, स्पील-६७ | सन २०१४-१५ चा अर्थसंकल्पात वार्ड | वार्ड नं.५५ येथे विविध |

| | | |
|---|---|---|
| अ.क्र.०५<br>सन २०१४-२०१५ | क्र.५५ कैसर कॉलनी रस्सीवाली गल्ली ते फातेमा स्कुल गल्ली व हम्ज़ा मस्जीदच्या मागील गल्लीतील दुषीत पाणी पुरवठा बंद करणे व पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी १०० व १५० मि.मी. जलवाहिनी टाकणे.<br>आर्थिक तरतुद ०८.९४ लक्ष. | ठिकाणी ईटालियन पेव्हर ब्लॉक बसविणे.<br>रु.०८.९४ लक्ष. |
| वार्ड-सी, स्पील-६७<br>अ.क्र.०६<br>सन २०१४-२०१५ | वार्ड क्र.५५ कैसर कॉलनी, चौधरी मंगल कार्यालय, बांबु यांच्या गल्लीतील दुषीत पाणी बंद करण्यासाठी व पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी विविध ठिकाणी १०० व १५० मि.मी. जलवाहिनी टाकणे.<br>आर्थिक तरतुद ०५.७१ लक्ष. | वार्ड नं.५५ येथे विविध ठिकाणी ईटालियन पेव्हर ब्लॉक बसविणे.<br>आर्थिक तरतुद रु. ०५.७१ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६६०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.४७ सिडको एन-६ या वॉर्डातील संभाजी कॉलनी ई-सेक्टर येथील खुल्या जागेमध्ये आमदार निधीतून बांधण्यात आलेल्या सभागृहास **“ क्रांतीवीर लहुजी साळवे सभागृह ”** असे नांव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.हुशारसिंग मांगेराम चव्हाण.

**अनुमोदक:-** श्री.विजय वाघचौरे, श्री.रावसाहेब गायकवाड.

मा.महापौर :- नामांतर समितीकडे पाठविण्यात यावे.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्ताव नामांतर समितीकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्रमांक ६६१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपातील प्रकल्प विभागातर्फे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत महिला बचत गट व स्वयंरोगारासाठी वैयक्तिक कर्ज प्रकरणे उद्दिष्टाप्रमाणे शिफारस करुन शासन योजनेनुसार कर्ज उपलब्ध करुन देणे. शहरातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे सर्वेक्षण करणे इ.कामे केली जात होती. सदरची सुवर्ण जयंती योजना दि. ३१ मार्च २०१४ पासून बंद केलेली असून त्याऐवजी केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान (National Urban Livelihood Mission) राबविण्यात येणार असून त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. या नवीन योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडून ७५ टक्के व राज्य शासनाकडून २५ टक्के निधी प्राप्त होणार आहे.

